**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०२**
**मा.स्थायी समिती सभेची नोटीस (ऑनलाईन झुम ॲप द्वारे)**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- ३१/०५/२०२१

प्रति,
मा. ------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा क्रमांक ०२ गुरूवार दिनांक ०३ /०६/२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता मा.उपसचिव , महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दिनांक ०६ मे २०२१ च्या पत्रान्वये कळविलेनुसार सदरची सभा ऑनलाईन झुम ॲप द्वारे आयोजित करण्यात आली आहे. या सभेमध्ये खालील परिशिष्टातील विषय विचाराधीन आहेत.

तरी सदर सभेत आपण ऑनलाईन सहभागी व्हावे अशी विनंती आहे.

सही /-
प्र.नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये अहमदनगर महानगरपालिका.

**गुरूवार दिनांक - ०३ /०६/२०२१ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| २३ | मा.स्थायी समिती सभा क्र. १० सोमवार दिनांक २४/०२/२०२० , मा.स्थायी समिती सभा क्र.१ मंगळवार दि.२१/७/२०२० व मा.स्थायी समिती क्र.२ शुक्रवार दिनांक ०७/०८/२०२० रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करणे |
| २४ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारिका यापदी अर्चना संदिप क्षत्रिय यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| २५ | अहमदनगर महानगरपालिका कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारिका यापदी १] शितल गंगाराम शिंदे ,२] तृप्ती रावसाहेब बडे यांना तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| २६ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ. रेणुका प्रणव जोशी यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबतचा ऑफिस रिपोर्ट |

| | |
|---|---|
| २७ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्यामध्ये पॅनल शिपवरील भुलतज्ञ डॉक्टरांच्या प्रति केस मानधन वाढीबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| २८ | अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेससाठी करारानसुार तात्पुरतया स्वरूपात वायरमन यापदी श्री. सुभाष बापुराव सुळ व इतर यांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट . |
| २९ | अहमदनगर महानगरपालिका पाणीपुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (मॅकेनिकल ) यापदी १] राहुल सदाशिव गिते, २] प्रदिप सदाशिव ढगे व (सिव्हील ) यापदी स्नहेल राजेंद्र मुळे यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| ३० | अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागामध्ये श्री.सागर मनोहर उबाळे व श्री.राजेंद्र रामआसरे जैसवाल यांची कंत्राटी तांत्रीक सहाय्यक या पदावर तसेच संजय हिरामण नागापुरे यांची पंपचालक या पदावर तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर नियुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ३१ | अहमदनगर महानगरपालिका शहर पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता मानधनावर नियुक्ती केलेले श्री. काळे सोमनाथ केशव, पाईप फिटर व श्री. अक्षय पोपट पवार, पाईप फिटर यांना तांत्रिक खंड देवुन मुदतवाढ देणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| ३२ | अर्जदार मालमत्ताधारक श्री. हरिश्र्चंद विठठल लेकुरवाळे , रा. पितळे कॉलनी नागापुर ,अ.नगर यांना प्रभाग क्र. १ वॉर्ड क्र.७२/अ बिल नं. ३१८ मालमत्ता क्रमांक Z१७२/A०३१९०९ याचे दुबार बिलाची रक्कम शास्तीसह निर्लेखित मंजूर करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ३३ | कोरोना विषाणु (कोव्हीड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेसाठी शासकीय तंत्रनिकेतन विद्यालय वसतिगृह कोव्हीड सेंटर येथे नवीन विद्युत व्यवस्था व दुरूस्ती करणेकामी झालेल्या रक्कम रूपये १,८५,८१३/- च्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| ३४ | अहमदनगर महानगरपालिकेस महानगरपालिकेच्या हद्दीत आवश्यकतेनुसार सन २०२१-२२ करिता खाजगी टॅकर्सने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे (जी.पी.एस. यंत्रणेसह) ई- निविदा क्र.६६२५४५ या निविदेच्या मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| ३५ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील उनाड, मोकाट , भटके, पिसाळलेले श्वानांचा बंदोबस्त करणे, निर्वीजीकरण, लसीकरण, पालन पोषन करणे व तत्सम सेवा पुरवणे (श्वान निर्बीजीकरण प्रकल्प राबवणे ) या कामी संस्था नियुक्त करण्यास ई- निविदा क्र.२०२१-ANMC- ६६३४८३-१ या ई-निविदेच्या मंजुरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट |

PTO

| | |
|---|---|
| ३६ | महानगरपालिका हद्दीतील पावसाळयापुर्वी मोठे नाले सफाई ,दैनंदिन गटर सफाई व रस्ते सफोई करीता बाह्य यंत्रणेमार्फत कर्मचारी (कामगार) उपलब्ध करून घेणेकामी दय दराची जाहिर ई - निविदा क्र.०२(ID६७६६३५)प्राप्त निविदेतील प्राप्त दरास प्रशासनाने केलेल्या मंजुर दरास व येणा-या खर्चास मंजूरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ३७ | अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील शासनाचे सुचनेनुसार मनपा हद्दीतील नागरिकांमध्ये जनजागृती कामी होर्डीग ,बॅनर व इतर कामांचे दर निश्चितीनुसार खाजगी एजन्सीची नियुक्ती करणेकामी जाहिर ई- निविदा सुचना क्र.०७ सन २०२०-२०२१ (T.ID ६३४३३७) प्राप्त निविदेतील प्राप्त दरास प्रशासनाने केलेल्या मंजुर दरास व येणारे खर्चास मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ३८ | अहमदनगर महानगरपालिका अग्निशमन विभागासाठी जिल्हा नियोजन विकास समितीमार्फत महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियाना अंतर्गत प्राप्त अनुदानातून साहित्य खरेदीबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**टिप-** १] प्रत्येक सदस्यांने आपल्या Android / Smartphone मध्ये Playstore वरून Zoom App डाउनलोड करून घ्यावे.

२] Zoom App द्वारे प्रत्येक सदस्यांना मा.स्थायी समिती सभेस उपस्थित राहता येईल.

३] मा.उपसचिव,महाराष्ट्र शासन नगरविकासविभाग यांचेकडील दिनांक ०६ मे २०२१ च्या पत्रान्वये कळविलेनुसार सदरची सभा ऑनलाईन झुम ॲप द्वारे आयोजित केली असून, सदर ऑनलाईन सभेच्या प्रक्रिये संदर्भात अधिक माहितीसाठी सन्मा.सदस्यांनी महापालिका सिस्टीम मॅनेजर श्री.अंबादास साळी मो.नं.९५६१००४६४४ यांचेशी संपर्क साधावा ही विनंती.

**सोबत-** १] विषय क्रमांक- २३ - मा.स्थायी समिती सभा क्र.१०सोमवार दिनांक २४/०२/२०२०,स्थायी समिती सभा क्र.१ मंगळवार दिनांक २१/०७/२०२० स्थायी समिती सभा क्र.२ दिनांक ०७/०८/२०२० रोजीच्या

सभेचे इतिवृत्ताची प्रत

**३]** विषय क्रमांक- २३ ते ३८ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०२**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

विषय क्रमांक- २३ गुरूवार दि. ०३/०६/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्र. १० सोमवार दिनांक २४/०२/२०२० , मा.स्थायी समिती सभा क्र.१ मंगळवार दि.२१/७/२०२० व मा.स्थायी समिती क्र.२ शुक्रवार दिनांक ०७/०८/२०२० रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करणे

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका नगरसचिव विभाग

मा.स्थायी समिती सभा क्र. १० सोमवार दिनांक २४/०२/२०२० , मा.स्थायी समिती सभा क्र.१ मंगळवार दि.२१/७/२०२० व मा.स्थायी समिती क्र.२ शुक्रवार दिनांक ०७/०८/२०२० रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---**---

**ऑनलाईन V.C. चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- मागील सभेचे इतिवृत्ताचे वाचन करा.

मागील सभा क्र. १०,०१ व २ या सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.शाम नळकांडे :- इतिवृत्त कायम करण्यात यावे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- इतिवृत्त कायम करण्यात यावे.

मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समिती सभा क्र. १० सोमवार दिनांक २४/०२/२०२० , मा.स्थायी समिती सभा क्र.१ मंगळवार दि.२१/७/२०२० व मा.स्थायी समिती क्र.२ शुक्रवार दिनांक ०७/०८/२०२० रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करण्यांत येत आहे.

**ठराव :-** मा.स्थायी समिती सभा क्र. १० सोमवार दिनांक २४/०२/२०२० , मा.स्थायी समिती सभा क्र.१ मंगळवार दि.२१/७/२०२० व मा.स्थायी समिती क्र.२ शुक्रवार दिनांक ०७/०८/२०२० रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

सुचक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०२**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

विषय क्रमांक- २४ गुरूवार दि. ०३/०६/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारिका यापदी अर्चना संदिप क्षत्रिय यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह जा.क्र.५४० दिनांक २३/१२/२०२० अन्वयेचा प्रस्ताव

उपरोक्त विषन्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, यापुर्वी कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचेकडील जा.क्र.७८ दिनांक १४/५/२०१९ व जा.क्र.५३९ दि.२५/११/२०१९ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १३९ दि.१७/१/२०२० अन्वयेच्या पारित मंजुरी ठरावाच्या अनुषंगाने जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणुक ७२२ दिनांक ११/०३/२०२० अन्वये कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी अर्चना संदिप क्षत्रिय यांची तांत्रिक खंड देवुन दिनांक १९/११/२०१९ पासून सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे पुर्ननियुक्ती करण्यात आलेली होती, सदरची मुदत ही यापुर्वीच दिनांक १९/०५/२०२० रोजी पासुन समाप्त झालेली आहे.

तरी संदर्भिय कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह जा.क्र.५४० दिनांक २३/१२/२०२० अन्वये सादर केलेल्या प्रस्तावावरील मा.आयुक्त यांचे दिनांक १७/१२/२०२० रोजीच्या शेरांकनानुसार की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी अर्चना संदिप क्षत्रिय यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता रू.१३०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत पुर्व मंजुरी मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव हा निर्णयाकरीता मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मुलेअ व मुलेप यांचा अभिप्राय घेण्यात यावा.

यावर लेखापरिक्षक व मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मा. शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.-२००५ प्र.क्र.४७/०५/१२ दि.२५ ऑगस्ट २००५ मधील परिच्छेद ५ मध्ये सर्व पदावरील नियुक्त्या विहीत / मार्गाने / माध्यमार्फत करण्याची दक्षता घ्यावी. अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या /अस्थायी नियुक्त्या कराव्या लागल्यातर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी असे नमूद केले आहे प्रस्तावीत परिचारिका पदी पुढील मुदतवाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकाचे अवलोकन करून उचित कार्यवाही करणे यावी.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, मानधनावर पुनर्नियुक्ती देण्याबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**<u>ऑनलाईन V.C. चर्चा :-</u>**

मा. सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारिका यापदी अर्चना संदिप क्षत्रिय यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- मला फोन आला, श्रीमती शेख पेशंट या कै.बा.दे.दवाखाना येथे ॲडमीट होण्यासाठी आल्या होत्या,त्यांना तपासणी साठी मोठे येणार,ते पहाणार असे तेथील कर्मचा-याने सांगीतले.त्या गरोदर होत्या त्यांचे बाळ पोटातच गेले.आपण वेळोवेळी डॉक्टर ,परिचारीका यांना वेळोवेळी मुदत वाढ देतो ,मानधन वाढवून देतो असे असतांना दवाखान्यात सेवा पुरविली जाते का? सेवा मिळाल्या पाहिजे.

वैद्यकिय अधिकारी डॉ.राजुरकर :-ज्या दिवशी पेशंट आले ,त्यासंदर्भात चर्चा झाली.डॉक्टरांनी पेशंट पाहिले,पेशंट ॲडमीट झाल्यानंतर तातडीने ट्रिटमेंट सुरू केली जाते.दवाखान्यामध्ये स्टाफ अपुरा आहे.डॉक्टर उपलब्ध नसले तरी तेथील नर्सेस ट्रिटमेंट सुरू करतात.गेल्या तीन - चार वर्षा मध्ये बराच स्टाफ सेवानिवृत्त झालेला आहे.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- तुम्ही स्टाफ ची मागणी करा.

वैद्यकिय अधिकारी डॉ.राजुरकर :-गेल्या वर्षा मध्ये ४२९१ पेशंट ॲडमीट झाले,२०,००० ओपीडी ,१००६ सिझेरीयन शस्त्रक्रीया,१५० कुटुंब नियोजन शस्त्रक्रीया झाल्या आहे.दवाखान्यामध्ये दिवसभर दोन डॉक्टर आहेत.भुलतज्ञ ऑन कॉल उपलब्ध असतात. सध्या कोरोनामुळे सिव्हील हॉस्पीटलमध्ये डिलेव्हरी बंद आहे.त्यामुळे कै.बा.दे.दवाखान्यामध्ये लोड वाढला आहे.या दवाखान्यामध्ये आय.सी.यु.ची सुविधा नाही. सिरीयस पेशंट रेफर करावे लागतात सिरीयस पेशंट विखे पाटिल हॉस्पीटल येथे पाठविण्यात येतात.आपण आउटसोर्सीग व्दारे स्टाफ भरण्याची प्रक्रिया राबविली आहे.दोन वेळा निविदा प्रसिध्द केली आहे.परंतु निविदेला प्रतिसाद मिळालेला नाही.पुन्हा फेर निविदा प्रसिध्द केली आहे.खर्चाच्या मर्यादेमुळे आस्थापना विभागाकडून स्टाफ मिळत नाही.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- कॉन्ट्रक्ट बेसेसवर घेवू शकत नाही का?

वैद्यकिय अधिकारी डॉ.राजुरकर :- त्याच धर्तीवर घ्या असे आमचे म्हणणे आहे.परंतु खर्चाच्या मर्यादेमुळे घेता येत नाही.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- नर्सिग कॉलेज मधून स्टाफ मिळू शकतो.

वैद्यकिय अधिकारी डॉ.राजुरकर :- ठराविक कालावधी साठी मिळतात.त्यांच्यावर जबाबदारी देता येत नाही.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- परत एकदा प्रस्ताव दया,मा.आयुक्त साहेब यांचे बरोबर चर्चा करून कसा मार्ग काढता येइल ते पहा. सेवेत सुधारणा कशी सुधारणा करता येतील ते पहा. दवाखान्यात नेहमी डॉक्टर उपस्थीत ठेवा.इमरर्जन्सी परिस्थीत डॉक्टर उपलब्ध झाले पाहिजे ते पहा.मा.सभापती साहेबांनी ब्लड बॅकेची पहाणी केली.तेथील प्लाझ्मा मशीन बंद होते.पॅथेलॉजीस्ट आले कि नाही याची माहिती दया.

वैद्यकिय अधिकारी डॉ.शेडाळे :- कंपनी शी टेक्नीशियन संदर्भात चर्चा केली.लॉकडाउन असल्याने येता येत नाही असे त्यांनी सांगीतले.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- आत्यावश्यक सेवा ,मेडीकल वर्क यावर कोणत्याही प्रकारची बंदी घातलेली नाही.तुम्ही तसे कळविले का ?आपण त्यांना नोटीस काढू लवकरात लवकर प्लाझ्मा मशिन कार्यान्वत करा.नगरकरांसाठी रक्त विघटन प्रक्रियेसाठी मशिन खरेदी कामी मोठया प्रमाणावर निधी उपलब्ध झाला ,या कोरोना काळात रक्ताची व रक्त घटकांची रूणांना सुविधा मिळाली असती.करोडो रूपये खर्च करून पाण्यात जात असतील तर त्याचा काय उपयोग.?लोकांना पाच ते सहा हजार रुपये खर्च करून

प्लाझ्मा विकत घ्यावा लागला.सर्वाची खाजगी लॅब मधून प्लाझ्मा खरेदी करण्याची आर्थीक परिस्थीती नसते.मनपाच्या रक्तपेढीच्या माध्यमातुन आपण ती कमी दरामध्ये उपलब्ध करून देवू शकलो असतो.ते देता आले नाही.

वैद्यकिय अधिकारी डॉ.शेडाळे :- आपली प्रासेस चालू आहे.

मा.सभापती साहेब :- हा महत्वाचा विषय आहे.उदया किंवा सोमवारी आरोग्य कमीटी सदस्य व अधिकारी यांची मिटींग घेवून कशी चालना देता येईल ते पहा.

मा.सौ.वंदना ताठे :- तीस-या लाटे बददल उपाययोजना बाबत चा विषय घेतला तो योग्यच आहे.यामध्ये लहान मुलांकरीता सुध्दा हॉस्पीटल ची व्यवस्था करा.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- कै.बा.दे.दवाखान्याच्या स्टाफ संदर्भात विषयी डॉक्टर नेहमी मांडतात.आपण इतर बाबींवर खर्च करीता असतांना दवाखान्यांवरील बाबींकडे दुर्लक्ष करता कामा नये.अडचणी येत असतील तर त्यावर कार्यवाही करावी.

मा.सभापती साहेब :- मा.आ.संग्राम भैय्या जगताप यांचे माध्यमातुन आठ ते नउ कोटी रूपये  करीता उपलब्ध झाले आहेत.डॉक्टर राजुरकरांना स्टाफ उपलब्ध करून देण्यासाठी मिटींग घेवू.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- मनपाचे अधिकारी व कर्मचारी लॉकडाउन असतांना वाढदिवस साजरे करीत असल्याबाबची व्हिडीओ क्लीप व्हायरल झाली आहे.वॉर्डतील काही नागरीकांनी त्यांचे वाढदिवस साजरे करण्याकरीता परवानगी मिळण्याची मागणी केली आहे.

मा.उपायुक्त (सा) श्री.पठारे :- त्या बाबत खुलासा मागविला आहे.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- प्रशासनासाठी वेगळा कायदा व सामान्य नागरीकांसाठी वेगळा कायदा कसा ? नोटीस च्या खुलाशाची २४ तासांची मुदत संपलेली आहे.

मा.उपायुक्त (सा) श्री.पठारे :- मा.आयुक्त साहेबांनी त्यांच्या स्तरावर मुदत वाढ दिली आहे.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- सामान्य माणसाने रस्त्यात कचरा टाकल्यावर दंडात्मक आकारणी केली जाते.दुकान उघडे असल्यास दंड आकारला जातो.कर्मचारी व अधिका-यांनी काही केले तरी चालते का?

मा.उपायुक्त (सा) श्री.पठारे :- खुलासा मागवून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- नगरसेवकांनी जनतेसाठी काही केले तर गुन्हे दाखल होतात.प्रशासनाने कोणतीही गोष्ट केली तर चालते.

मा.सभापती साहेब :- या गोष्टीची गंभीर दखल घेवून कारवाई करा.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- नगरशहरामध्ये लसीकरण चालू आहे.लसीकरणामध्ये अपंग व वयोवृध्द व्यक्तींसाठी काही व्यवस्था केली आहे का?त्यांचे साठी व्यवस्था करणे गरजेचे आहे.जे लसीकरण केंद्रपर्यत येवू शकत नाही त्यांच्यासाठी घरपोहोच लसीकरणाची व्यवस्था करावी.लसीकरणाकरीता नागरीक ताटकळून जातात व लस न मिळाल्याने निघून जातात.

अपंगांसाठी स्वतंत्र्य व्यवस्था करावी अशी माझी प्रशासनास सुचना आहे.

मा.सभापती साहेब :- अगोदर लस तर येवू दया.प्रशासनाने उत्तर दयावे.चार दिवस झाले लसीकरण बंद आहे.लसीकरण म्हणेज जीवन मरणाचा प्रश्न आहे.लसीमुळे त्याव्यक्तीचा जीव वाचनार आहे.

वैद्यकिय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे : - आत्तापर्यत ८३ हजार डोस नगरशहरात दिले.आपल्याला जिल्हापरीषदेकडून लस उपलब्ध होते.रविवारी १९०० डोस आले.काल आपल्या राज्याच्या अतिरीक्त संचालक यांनी आढावा लसीकरणा बाबत आढावा घेतला.त्यांनी सेकंड डोस मध्ये फ्रंटलाईन वर्कर्स यांना प्रधान्य दया ,अश्या सुचना दिल्या आहे.तुम्ही बॅकलॉक काढून घ्या.बॅकलॉक लवकर भरला तर पोर्टलवर एन्ट्री करता येईल.

मा.सभापती साहेब :- आपल्याला सुध्दा दिव्यांगांसाठी काही योजना कराव्यात लागतील.

वैद्यकिय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे : - आपल्याला सो- मोटो निर्णय घेणे योग्य होणार नाही.अपंग व्यक्तींसाठी ,आठवडयातील एक दिवस राखुन ठेवता येईल.मुंबई सारखी व्यवस्था आपल्याला करता येईल .मनपाच्या व्हॉन मधून त्यांना लस देता येईल.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- आठवडयातुन एक दिवस दिव्यंग व वृध्द व्यक्तींसाठी राखुन ठेवा ,प्रशासनाला तश्या सुचना करा.

मा.सभापती साहेब :- आठवडयाती एक दिवस दिव्यांग व्यक्तीसाठी व वृध्दांसाठी राखून ठेवा.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- परदेशात जाणा-या विदयार्थी ,नागरीकांना परदेशात जाण्यासाठी लसीकरण झाल्याबाबत प्रमाणपत्र मागीतले जाते.लस मिळत नसल्याने त्यांना अडचणी येत आहे.

वैद्यकिय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे : - आजच माझ्याकडे विदयार्थी आले होते.मी या आगोदर सांगीतल्यानुसार १८ ते ४४ पर्यतच्या नागरीकांना लसीकरण करू नये बाबत सुचना आहेत.बॅकलॉक भरून काढला तर परवानगी देता येईल.डॉ.पाठक हॉस्पीटल यांचे कडे २०० डोस उपलब्ध झाले आहेत.सीरम इंन्टीटूट कडून रू.९००/- पर्यत लस उपलब्ध होवू शकते.डॉ.पाठक यांचेशी बोलून हॉस्पीटलशी टायेप करात येईल.त्याचा खर्च मनपाने करायचा का याचा धोरनात्मक निर्णय आपण घ्यावा.

मा.सभापती साहेब :- तुम्ही त्यांच्याशी चर्चा करा.जो निर्णय होईल त्याची व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- आरोग्याशी निगडीत गोष्टी निर्णय घेतांना आरोग्य कमीटीला सांगीतलेतर विषय अवगत होतील. कर्मचा-यांना तसे आदेश दया,आरोग्य कमीटीमध्ये वैद्यकिय क्षेत्राच्या संबंधीत सदस्य आहेत.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :- आरोगय विषयक काही असेल तर आपल्याला निमंत्रीत करण्यात येईल.

मा.सभापती साहेब :- हा महत्वाचा मुद्दा आहे.डॉ.बोरूडे ,अध्यक्ष आहेत.त्यांचे काम चांगल्या पध्दतीने चालू आहे.तुमचे कॉर्डीनेशन असने खुप महत्वाचे आहे.कोणताही निणृय घ्यायचा असेल तर आरोग्य कमीटीशी कॉर्डीनेशन करून निर्णय घ्या.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :- कॉर्डीनेशन मध्ये रहातो.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- आजच्या मिटींग करीता मा.आयुक्त साहेब यांना उपस्थीत रहाणे बंधन कारक नाही.परंतु,उपायुक्त सुध्दा दिसत नाही.

मा.सभापती साहेब :- उपायुक्त श्री.पठारे साहेब व श्री.डांगे साहेब उपस्थीत आहेत.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- आरोग्य विभागाशी निगडीत काही गोष्टी असतील तर नुकतीच आरोग्य कर्मचा-यांचे ट्रेनींग चे शेषन झाले.आमच्या आमच्या आरोग्य कमीटी मध्ये मी स्वत: डॉक्टर आहे.वारे साहेब फार्मशीस्ट आहेत.कर्मचा-यांच्या ट्रेनींग मध्ये कर्मचा-यांना दोन गोष्टी सांगू शकलो असतो.अशा गोष्टीं असतील तर आम्हाला अवगत केले तर योग्य राहील.

उपायुक्त (कर) श्री.डांगे :- हा कोविड चा विषय नव्हता,वाहत्या पाण्यात ग्लोज कसे वापरायचे याचे प्रत्यक्षीक होते.त्यामुळे आपल्याला बोलविण्यात आले नाही.येथून पुढे बोलविण्यात येईल.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- लाईट चे मटेरीयल आपल्याकडे सध्या उपलब्ध नाही.त्यामुळे मेंन्टनन्स चे काम बंद आहे.तर आपली इलेक्ट्रीक विभागाचे गाडी आहे ती आपण भाडयाने देतो का?

इलेक्ट्रीक विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- आपण उदयान विभागाकडे गाडी देतो.सध्या ट्री कटींग ची कामे आहेत.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- आंबे काढण्या करीता आपण गाडी देतो का?आपण सावेडी विभागाच्या वायरमन कडे चौकशी करावी.आपल्या इलेक्ट्रीक विभागाच्या गाडीने एका नगरसेवकाच्या घरचे आंबे काढण्या करीता तीचा वापर करण्यात येत होता.आपण भाडे तत्वावर गाडी देत असाल तर बाकीच्या नागरीकांना त्याचा उपयोग होईल.

इलेक्ट्रीक विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- आपण गाडी भाडयाने देत नाही ? मी चौकशी करतो.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- काही नगरसेवकांनी गाडी मागीतल्यावर आठ -आठ दिवस गाडी मिळत नाही.काही नगरसेवक या गाडीचा उपयोग करून स्वत:च्या घरातले आंबे काढतात.

इलेक्ट्रीक विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- असा काही प्रकार झाला असेत तर मी संबंधीत वायरमन वर कारवाई प्रस्तावित करतो.

मा.श्री.मनोज कोतकर :- सध्या जे लसीकरण चालू आहे.शहरामध्ये सात सेंटर आहेत.सर्व सेंटरवर ज्या प्रमाणात लस येते त्या प्रमाणात केडगांवला लस येत नाही.इतर केंद्रांप्रमाणे केडगांवला लस दिली तर बरे होईल.

मा.सभापती साहेब :- सध्या लसीकरणाचा विषय महत्वाचा आहे.

मा.श्री.मनोज कोतकर :- इतर केंद्रावर लस ७०० ते ८०० येतात.केडगांवच्या केंद्रावर ६० ते ७० लस येतात.कमीत कमी १०० लस तरी आली पाहिजे.

मा.सभापती साहेब :- प्रत्येक केंद्रावर सारख्या वाटप झाल्या पाहिजे.

मा.श्री.मनोज कोतकर :- केडगांवला या मुळे वाद होत आहे.

उपायुक्त श्री.डांगे :- सोशल मिडीयावर आपण पब्लीश करणार आहे.त्याप्रमाणे आपण त्याची अंमलबजावणी करू.समान वाटप होईल.

मा.सभापती साहेब :- समान वाटप करण्यात यावे.म्हणजे वाद विवाद होत नाही.लवकरात लवकर लस उपलब्ध कशी होईल ते पहा.आम्ही सुध्दा मा.शासनाकडे लस जास्तीत जास्त कशी उपलब्ध होईल हे पहावे लागेल.

मा.श्री.मनोज कोतकर :- एल.ए.डी.लाईटचा प्रश्न मार्गी लागला आहे.त्या ठिकाणी असलेले वायरमन त्यांना कंटीन्यु करण्यात यावे.

इलेक्ट्रीक विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- आपण कॉन्ट्रक दिले तरी सव्हीस वायर मेंटनन्स आपल्याकडे आहे.कॉन्ट्रक्टरने फक्त एल.ए.डी.बल्फ बदलण्याचे काम आहे.बाकीचे सर्व काम आपल्या कडेच आहे.

मा.श्री.मनोज कोतकर :- मला असे समजले की ज्या वायरमनला ट्रेनिग दिले आहे त्यांनाच ठेवणार आहे.पाहिजे तर सध्याच्या वायरमन ला तीन महिने ट्रेनिंग दया.मी आठ दिवसांपुर्वी पत्र दिले आहे.लाईट बसविल्या नाही तर मी उपोषनाला बसणार आहे.आमचे प्रश्न सुटले नाही तर आम्हाल आंदोलन करावे लागेल.मी आयुक्त साहेबांच्या दालनामध्ये उपोषनाला बसलो होते.श्री.पठारे साहेब त्यावेळी आले होते.

मा.सभापती साहेब :- एल.ए.डी.चा प्रश्न चालू आहे.त्यामध्ये प्रॉब्लेम येत आहे.ते जर झाले नाही तर पुन्हा नविन निविदा प्रसध्दि करा म्हणून सांगीतले आहे.ती सुध्दा निविदा प्रसिध्द झालेली आहे.कोर्टकेसेस मुळे लाईट विषय रेंगाळला आहे.

मा.श्री.मनोज कोतकर :- दोन्ही ठेकेदारांना बोलावून सांगा,तुमच्या भांडणमध्ये शहरास का वेठीस धरता.

मा.सभापती साहेब :- चर्चा करून मार्ग काढू

मा.सौ.सोनाबाई शिंदे :- विषय क्रमांक २४ ते २९ मंजूर करण्यात यावे.

मा.सौ.वंदना ताठे :- विषय क्रमांक २४ ते २९ चे ऑफिस रिपोर्ट मंजूर करावेत.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारिका यापदी अर्चना संदिप क्षत्रिय यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करा
रबध्द पुर्ननियुक्तीस मान्यता देण्यात येत आहे.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्ट नुसार कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी अर्चना संदिप क्षत्रिय यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता रू.१३०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ.सोनाबाई शिंदे सही/-

अनुमोदक :- मा.सौ.वंदना ताठे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०२**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

विषय क्रमांक- २५ गुरूवार दि. ०३/०६/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारिका यापदी १] शितल गंगाराम शिंदे ,२] तृप्ती रावसाहेब बडे यांना तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

**संदर्भ-** कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचेकडील जा.क्र.७९६ दि.१९/०३/२०२१ चा प्रस्ताव

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांनी त्यांचेकडील जा.क्र. कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना ७९६ दि.१९/३/२०२१ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारिका यापदी १] शितल गंगाराम शिंदे, २] तृप्ती रावसाहेब बडे यांचा अटी व शर्ती नुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीचा कालावधी दि.१८/०१/२०२० पासून सहा महिन्याकरीता असुन सदरची मुदत ही दि.१७/०७/२०२० रोजी पासुन समाप्त झालेली असल्याने त्यांना तांत्रिक खंड देवुन दि.२१/०७/२०२० पासून पुढील सहा महिन्याकरिता मानधनावर पुर्ननियुक्ती करणेबाबत सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये मा.स्थायी समिती ठराव क्र.६२ दि.२८/१२/२०२०च्या पुर्व मान्यता पारित ठरावाच्या अनुषंगाने अनुक्रमे जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक ७२५ ,७२६ दि.०४/०३/२०२१ अन्वये कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना करीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारिका यापदी १] शितल गंगाराम शिंदे, २] तृप्ती रावसाहेब बडे यांची रू.१३०००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून दि.१८/०१/२०२० पासून सहा महिन्याकरिता करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन सदरची मुदत ही दि. अनुक्रमे दि.१७/०७/२०२० व १८/०७/२०२० रोजी पासुन समाप्त झालेली आहे.

तरी वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी १] शितल गंगाराम शिंदे ,२] तृप्ती रावसाहेब बडे यांना तांत्रिक खंड देवुन दिनांक २१/०७/२०२० पासून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे रू.१३०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे कामी निर्णयासाठी सादर करणे करीता मा. मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेवुन सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर./अ

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा. सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की, "अ" प्रमाणे मुलेप यांचा अभिप्राय घेवून सादर करावे.

यावर लेखापरिक्षक / मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मा.शासन,सामान्य प्रशासक विभाग ,शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.-२००५ /प्र.क्र.४७ /०५/१२ दि.२५ ऑगस्ट २००५ मधील परिच्छेद क्र.५ मध्ये सर्व पदावरील नियुक्या विहीत मार्गाने /माध्यमा मार्फत करण्याची दक्षता घ्यावी.अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या/अस्थायी नियुक्या कराव्या लागल्यावर तर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी.असे नमुद केले आहे.

प्रस्तावीत परिचारीकापदी पुढील मुदत वाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकाचे अवलोकन करून उचित कार्यवाही करावी.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,१)कै.बा.दे.दवाखाना यांचे दि.१२/०३/२०२१ चे पत्र.२) तसेच मुलेप यांचे अभिप्रायनुसार मा.स्थायी समिती मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,मा.स्थायी समिती कडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

विषय पत्रिकेतील विषय क्रमांक २४ मध्ये झालेल्या चर्चे नुसार

मा.सौ.सोनाबाई शिंदे :- विषय क्रमांक २४ ते २९ मंजूर करण्यात यावे.

मा.सौ.वंदना ताठे :- विषय क्रमांक २४ ते २९ चे ऑफिस रिपोर्ट मंजूर करावेत.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारिका यापदी १] शितल गंगाराम शिंदे ,२] तृप्ती रावसाहेब बडे यांना तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबच्या ऑफिस रिपोर्टास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी १] शितल गंगाराम शिंदे ,२] तृप्ती रावसाहेब बडे यांना तांत्रिक खंड देवुन दिनांक २१/०७/२०२० पासून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे रू.१३०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ.सोनाबाई शिंदे सही/-

अनुमोदक :- मा.सौ.वंदना ताठे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०२**
**(ऑनलाईन झुम अॅप व्दारे)**

विषय क्रमांक- २६ गुरूवार दि. ०३/०६/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ. रेणुका प्रणव जोशी यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

**संदर्भ-** कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचेकडील जा.क्र.७९७ दि.१९/०३/२०२१ चा प्रस्ताव.

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की,कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांनी त्यांचेकडील जा.क्र.कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ.रेणुका प्रणव जोशी यांचा अटी व शर्तीनुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीचा कालावधी दि.२३/०७/२०२० ते २२/०१/२०२१ अखेर असून सदरची मुदत ही दिनांक २३/०१/२०२१ रोजी पासुन समाप्त झालेली असल्याने त्यांना तांत्रीक खंड देवून दि.२५/०१/२०२१ पासुन पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननियुक्ती करणेबाबत सुचित केलेले आहे.सद्यस्थितीमध्ये मा.स्थायी समिती ठराव क्र.६१ दि.२८/१२/२०२० च्या पुर्व मान्यता पारीत ठरावाच्या अनुषंगाने जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणूक ७२८दि.०४/०३/२०२१ अन्वये कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्या करीता करारबध्द तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ.रेणूका प्रणव जोशी यांची रू.२८,०००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून दि.२३/०७/२०२० पासून सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असून सदरची मुदत ही २३/०१/२०२१ पासून समाप्त झालेली आहे.

तरी वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ.रेणुका प्रणव जोशी यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून दिनांक २६/०१/२०२१ पासून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे रूपये २८,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे कामी निर्णयासाठी सादर करणे करीता मा.मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय घेवून सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजूरीस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की, "अ" प्रमाणे अभिप्राय घेवून सादर करावे.

यावर लेखापरिक्षक / मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मा.शासन,सामान्य प्रशासक विभाग ,शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.-२००५ /प्र.क्र.४७ /०५/१२ दि.२५ ऑगस्ट २००५ मधील परिच्छेद क्र.५ मध्ये सर्व पदावरील नियुक्त्या विहीत मार्गाने /माध्यमा मार्फत करण्याची दक्षता घ्यावी.अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या/अस्थायी नियुक्त्या कराव्या लागल्यावर तर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी.असे नमुद केले आहे.

प्रस्तावीत वैद्यकीय अधिकारी यापदी पुढील मुदत वाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकाचे अवलोकन करून उचित कार्यवाही करावी.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,१)कै.बा.दे.दवाखाना यांचे दि.१२/०२/२०२१ चे पत्र.२) तसेच मुलेप यांचे अभिप्रायनुसार मा.स्थायी समिती मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,मा.स्थायी समिती कडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर

--**--

**ऑनलाईन V.C. चर्चा :-**

विषय पत्रिकेतील विषय क्रमांक २४ मध्ये झालेल्या चर्चे नुसार

मा.सौ.सोनाबाई शिंदे :- विषय क्रमांक २४ ते २९ मंजूर करण्यात यावे.

मा.सौ.वंदना ताठे :- विषय क्रमांक २४ ते २९ चे ऑफिस रिपोर्ट मंजूर करावेत.

मा.सभापती साहेब :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ.रेणुका प्रणव जोशी यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून दिनांक २६/०१/२०२१ पासून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे रूपये २८,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ.रेणुका प्रणव जोशी यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून दिनांक २६/०१/२०२१ पासून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे रूपये २८,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ.सोनाबाई शिंदे सही/-

अनुमोदक :- मा.सौ.वंदना ताठे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०२**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

विषय क्रमांक- २७ गुरूवार दि. ०३/०६/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्यामध्ये पॅनल शिपवरील भुलतज्ञ डॉक्टरांच्या प्रति केस मानधन वाढीबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह

संदर्भ- १. जा.क्र.कै.बा.दे.दवाखाना २२५ दिनांक २५/६/२०१९ने पॅनल नेमणूक
२. मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.७३ दिनांक ०६/०२/२०१८ ने मानधन वाढ
३. पॅनलवरील डॉक्टराचा प्रति केस मानधन वाढीबाबतचा दिनांक ११/०१/२०२१ चा अर्ज
४. भुलतज्ञ डॉक्टरांशी दिनांक ०५/०३/२०२१ रोजी दु.४.०० वा. झालेली बैठक,

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार कै.बा.दे.दवाखान्यामार्फत विनंती पुर्वक रिपोर्ट देण्यांत येतो की, दवाखान्याकरिता सिझेरीयन शस्त्रक्रिया, एम.टी.पी.शस्त्रक्रिया, कुंटुंब नियोजन शस्त्रक्रिया इ. करिता भुलतज्ञांची आवश्यकता भासते. त्याकरिता जा.क्र.कै.बा.दे. दवाखाना २२५ दि.२५/०६/२०१९ अन्वये खाजगी भुलतज्ञांची तात्पुरत्या स्वरूपात दिनांक २५/६/२०१९ ते ०९/०७/२०२१ अखेर पॅनलशीपवर नेमणूक करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे १. मायनर ऑपरेशन जनरल ॲनेस्थेशिया (G.A.) करिता रू.६००/- प्रति केस, २. मायनर ऑपरेशन स्पायनल ॲनेस्थेशिया (S.A.) करिता रू.८००/- प्रति केस, ३. सिझेरीयन शस्त्रक्रिया करिता रू.१५००/- प्रति केस, ४. नाईट सिझेरीयन व हायरीसक करिता रू.१७००/- प्रति केस (Night १०.०० pm to ६.०० am) याप्रमाणे दवाखान्यामधील आवश्यकतेनुसार पॅनल मधील भुलतज्ञांचे कॉल केल्यानंतर भुलतज्ञ दवाखान्यामध्ये येउन रूग्णाला भुल देण्याचे काम करतात. वरील भुलतज्ञांचा पॅनल दवाखान्यामध्ये साधारण २५ वर्षापासुन भुल देणे संदर्भात अत्यल्प दरात सेवा पुरवित आहेत. यापुर्वी भुलतज्ञ डॉक्टरांच्या प्रति केस मानधन वाढ ही वरील संदर्भ क्र.२ ने तीन वर्षापुर्वी सन २०१८ मध्ये करण्यात आलेली आहे. सदर पॅनलमधील भुलतज्ञ डॉक्टरांनी मानधन वाढ व इतर बाबींकरिता संदर्भ क्र.३ ने विनंती अर्ज दिलेला आहे. त्या अनुषंगाने दिनांक ०५/०३/२०२१ रोजी दुपारी ४.०० वा भुलतज्ञ डॉक्टरांच्या संघटनेशी सभासदांना चर्चेकरिता बैठक आयोजित करण्यात आली.

सदर बैठकीमध्ये भुलतज्ञ डॉक्टांशी चर्चा करून त्यांनी मागणी केलेल्या मानधन वाढीबाबत व बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार या कार्यालयाकडील प्रस्तावीत वाढीचा तुलनात्मक तक्त्या सोबत जोडलेला आहे.

वरील तक्त्या या कार्यालयामार्फत प्रस्तावीत केल्याप्रमाणे मायनर ऑपरेशन पुढील प्रमाणे- (D&C, D&E, M.T.P., M.T.P., with T.L. , Episiotomy resuturing, round resuturing, Tubectomy, secondary suturing after delivery, abscess drainage) , मेजर ऑपरेशन पुढील प्रमाणे (L.S.C.S. , Laparotomy), हायरिस्क ऑपरेशन पुढीलप्रमाणे (severe P.I.H. Previous two L.S.C.S., severe Anaemea, D.M., any medical problem of patient) व नाईट म्हणजे (११.०० pm to ७.०० am मध्ये होणा-या शस्त्रक्रिया) या बाबींचा समोवश आहे. सदरची दरवाढ ही सध्याच्या पॅनलच्या मुदत दिनांक ९/७/२०२१ पर्यत व पुढील तीन वर्षाकरिता पॅनल नेमणूकीच्या कालावधी करिता असेल. सध्याच्या दरांच्या प्रति वर्षी १० टक्के दरवाढ गृहीत धरून या कार्यालयाने सोबतच्या तक्त्या दर प्रस्तावीत केलेले आहे. सध्या खाजगी दवाखान्यांमध्ये भुलीचे दर पाहता वरील दर हे अत्यंत कमी व वाजवी

आहेत. तसेच एखाद्या अतिजोखमीच्या शस्त्रक्रियेस एका वेळी दोन भुलतज्ञ डॉक्टरांची आवश्यकता भासल्यास त्याकरिता दिवसा भुल देणे करिता प्रत्येक भुलतज्ञास रू.२०००/- प्रति केस मानधन व रात्रपाळीस भुल देणेकरिता प्रत्येक भुलतज्ञास रू.२२५०/- प्रति केस मानधन याप्रमाणे मानधन अदा करण्याचे ठरविण्यात आलेले आहे.

तरी कै. बा. दे. दवाखान्याची भुलतज्ञ डॉक्टरां अभावी गैरसोय होउ नये म्हणुन १. मायनर ऑपरेशन जनरल ॲनेस्थेशिया (G.A.) करिता रू.८००/- प्रति केस, २. मायनर ऑपरेशन स्पायनल ॲनेस्थेशिया (S.A.) करिता रू.१०००/- प्रति केस, ३. सिझेरीयन शस्त्रक्रिया करिता रू.२०००/- प्रति केस, ४. नाईट सिझेरीयन व हायरीसक करिता रू.२२५०/- प्रति केस (Night ११.०० pm to ७.०० am) तसेच एखाद्या अतिजोखमीच्या शस्त्रक्रियेस एका वेळी दोन भुलतज्ञ डॉक्टरांची आवश्यकता भासल्यास त्याकरिता दिवसा भुल देणेकरिता प्रत्येक भुलतज्ञास रू.२०००/- प्रति केस मानधन व रात्रपाळीस भुल देणेकरिता प्रत्येक भुलतज्ञास रू.२२५०/- प्रति केस मानधन ज्या याप्रमाणे संदर्भ क्र.१ नुसार सध्या नेमण्यात आलेल्या भुलतज्ञ डॉक्टरांच्या पॅनलला मानधन वाढ देणे उचित वाटते. सदरचे वाढीव दर हे किमान दोन वर्षाकरिता लागु असतील. तरी भुलतज्ञ डॉक्टरांच्या मानधन वाढी बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे निर्णयास्तव ठेवणेस मान्यतेस्तव सविनय सादर./अ

येणेप्रमाणे प्र. वैद्यकीय अधिक्षक, कै.बा.दे.वा. व सुतिका गृह यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर

--**--

**<u>ऑनलाईन V.C. चर्चा :-</u>**

विषय पत्रिकेतील विषय क्रमांक २४ मध्ये झालेल्या चर्चे नुसार

मा.सौ.सोनाबाई शिंदे :- विषय क्रमांक २४ ते २९ मंजूर करण्यात यावे.

मा.सौ.वंदना ताठे :- विषय क्रमांक २४ ते २९ चे ऑफिस रिपोर्ट मंजूर करावेत.

मा.सभापती साहेब :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता अत्यावश्यक सेवेसाठी पॅनल शिपवरील भुलतज्ञ डॉक्टरांच्या प्रति केस मानधन १. मायनर ऑपरेशन जनरल ॲनेस्थेशिया (G.A.) करिता रू.८००/- प्रति केस, २. मायनर ऑपरेशन स्पायनल ॲनेस्थेशिया (S.A.) करिता रू.१०००/- प्रति केस, ३. सिझेरीयन शस्त्रक्रिया करिता रू.२०००/- प्रति केस, ४. नाईट सिझेरीयन व हायरीसक करिता रू.२२५०/- प्रति केस (Night ११.०० pm to ७.०० am) तसेच एखाद्या अतिजोखमीच्या शस्त्रक्रियेस एका वेळी दोन भुलतज्ञ डॉक्टरांची आवश्यकता भासल्यास त्याकरिता दिवसा भुल देणेकरिता प्रत्येक भुलतज्ञास रू.२०००/- प्रति केस मानधन व रात्रपाळीस भुल देणेकरिता प्रत्येक भुलतज्ञास रू.२२५०/- प्रति केस मानधन देणे बाबतच्या भुलतज्ञ डॉक्टरांच्या पॅनलवरील डॉक्टरांचे मानधन वाढीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.प्रस्तावीत दर हे किमान दोन वर्षाकरिता लागू राहतील.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता अत्यावश्यक सेवेसाठी पॅनल शिपवरील भुलतज्ञ डॉक्टरांच्या प्रति केस मानधन १. मायनर ऑपरेशन जनरल ॲनेस्थेशिया (G.A.) करिता रू.८००/- प्रति केस, २. मायनर ऑपरेशन स्पायनल ॲनेस्थेशिया (S.A.) करिता रू.१०००/- प्रति केस, ३. सिझेरीयन शस्त्रक्रिया करिता रू.२०००/- प्रति केस, ४. नाईट सिझेरीयन व हायरीसक करिता रू.२२५०/- प्रति केस (Night ११.०० pm to ७.०० am) तसेच एखाद्या अतिजोखमीच्या शस्त्रक्रियेस एका वेळी दोन भुलतज्ञ डॉक्टरांची आवश्यकता भासल्यास त्याकरिता दिवसा भुल देणेकरिता प्रत्येक भुलतज्ञास रू.२०००/- प्रति केस मानधन व रात्रपाळीस भुल देणेकरिता प्रत्येक भुलतज्ञास रू.२२५०/- प्रति केस मानधन देणे बाबतच्या भुलतज्ञ डॉक्टरांच्या पॅनलवरील डॉक्टरांचे मानधन वाढीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.प्रस्तावीत दर हे किमान दोन वर्षाकरिता लागू राहतील.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ.सोनाबाई शिंदे सही/-

अनुमोदक :- मा.सौ.वंदना ताठे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०२**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

विषय क्रमांक- २८ गुरूवार दि. ०३/०६/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेससाठी करारानसुार तात्पुरतया स्वरूपात वायरमन यापदी श्री. सुभाष बापुराव सुळ व इतर यांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट .

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

**संदर्भ-** इलेक्ट्रीक विभाग यांचेकडी जा.क्र.३७१ दि.१९/०१/२०२१ अन्वयेचा प्रस्ताव.

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की,इलेक्ट्रीक विभाग यांनी त्यांचेकडील संदर्भिय प्रस्ताव सादर करून त्यामध्ये इलेक्ट्रीक विभागाकडील करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी दर्शविलेल्या संबंधितांची मानधनावर नियुक्ती केलेली असून त्याबाबतची माहिती खालील प्रमाणे नमुद केलेली आहे.

| अ.क्र. | नांव | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | दरमहा मानधन रू. | जा.क्र.आस्था करारबध्द नेमणूक व दिनांक | नियुक्ती कालावधी | मुदत समाप्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुभाष बापुराव सुळ | वायरमन | १४,२५०/- | जा.क्र.६६ दि.०८/०१/२०२१ | २७/११/२०२० ते २६/०५/२०२१ अखेर सहा महिन्या करीता | दि.२७/०५/२०२१ पासुन |
| २ | लोंढे नवनाथ बाळासाहेब | वायरमन | १४,२५०/ | जा.क्र.६६ दि.०८/०१/२०२१ | २७/११/२०२० ते २६/०५/२०२१ अखेर सहा महिन्या करीता | दि.२७/०५/२०२१ पासुन |
| ३ | काटकर लंकेश तुकाराम | वायरमन | १४,२५०/ | जा.क्र.६६ दि.०८/०१/२०२१ | २७/११/२०२० ते २६/०५/२०२१ अखेर सहा महिन्या करीता | दि.२७/०५/२०२१ पासुन |
| ४ | डहाळे सौरभ भाउसाहेब | वायरमन | १४,२५०/ | जा.क्र.६६ दि.०८/०१/२०२१ | २७/११/२०२० ते २६/०५/२०२१ अखेर सहा महिन्या करीता | दि.२७/०५/२०२१ पासुन |
| ५ | अंकित किशोर कासवा | वायरमन | १४,२५०/ | जा.क्र.६६ दि.०८/०१/२०२१ | २७/११/२०२० ते २६/०५/२०२१ अखेर सहा महिन्या करीता | दि.२७/०५/२०२१ पासुन |
| ६ | जावळे अनिल श्रीरंग | वायरमन | १४,२५०/ | जा.क्र.६६ दि.०८/०१/२०२१ | २७/११/२०२० ते २६/०५/२०२१ अखेर सहा महिन्या करीता | दि.२७/०५/२०२१ पासुन |
| ७ | शिंदे महेश अर्जुन | वायरमन | १४,२५०/ | जा.क्र.६६ दि.०८/०१/२०२१ | २७/११/२०२० ते २६/०५/२०२१ अखेर सहा महिन्या करीता | दि.२७/०५/२०२१ पासुन |
| ८ | खान शादाब रफिक | वायरमन | १४,२५०/ | जा.क्र.६६ दि.०८/०१/२०२१ | २७/११/२०२० ते २६/०५/२०२१ अखेर सहा महिन्या करीता | दि.२७/०५/२०२१ पासुन |

वरील दर्शविल्याप्रमाणे एकुण ८ वायरमन यांची मुदत वरील संदर्भिय आदेशानुसार संपत असल्याने त्यांना ३ दिवसांचा तांत्रिक खंड देवून ६ महिन्याकरीता मुदतवाढीस मंजुरी मिळणेस " नमुद करून सुचित केलेले आहे.सदयस्थितीमध्ये मा.स्थायी समिती ठराव क्र.५३ दि.११/११/२०२० अन्वयेच्या मान्यता पारीत ठरावानुसार जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक ६६ दि.०८/०१/२०२१ अन्वये सुभाष बापुराव सुळ व इतर यांची मानधनावर तांत्रिक खंड देवून दि.२७/११/२०२० पासून सहा महिन्याकरीता व जा.क्र. आस्था.करारबध्द नेमणूक ६७ दि.०८/०१/२०२१ अन्वये खान शादाब रफीक यांची मानधनावर तांत्रिक खंड देवून दि.१७/११/२०२० पासून सहा महिन्याकरीता व अटी व शर्तीनुसार दरमहा रूपये १४,२५०/- या मानधनावर करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली असून सदर नियुक्तीची मुदत ही अनुक्रमे दि.२७/०५/२०२१ व १७/०५/२०२१ रोजी पासून समाप्त होणार आहे.

सद्यस्थितीमध्ये विद्युत विभागामार्फत अहमदनगर महानगरपालिका हद्दीमधील एन जी.सोव्हिंग स्मार्ट एल.ई.डी दिवे डी बी एफ ओ एम एम टी तत्वावर एजन्सीची नियुक्ती करणेबाबतची कार्यवाही प्रस्तावित आहे.

संदर्भीय प्रस्तावाच्या अनुषंगाने इले.विभागाकडील संबंधितांची तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी तांत्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरिता मानधनावर पुर्णनेमणूक करणेबाबत निर्णय झाल्यास संबंधितांच्या नियुक्ती आदेशामध्ये सदर नियुक्ती कालावधीमध्ये वरील दर्शविलेल्या कामकाजाकरिता एजन्सीची नियुक्ती झाल्यास सदरची नियुक्ती तात्काळ संपुष्टात येईल याबाबतची नव्याने अट समाविष्ट करणे उचित होईल.

तसे इलेक्ट्रीक विभाग यांचेकडील वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ च्या तरतुदीनुसार वरील तक्त्यामधील श्री.सुभाष बापुराव सुळ व इतर यांची इलेक्ट्रीक विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी त्यांना तीन दिवसांचा तात्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे रूपये १४,२५०/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजूरी मिळणे कामी निर्णयासाठी सादर करणे करिता मा.मुख्यलेखाधिकारी व मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेवून सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजूरीस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,मुलेअ व मुलेप यांचा अभिप्राय घेण्यात यावा.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,संबंधीत वायरमन कर्मचारी यांचे सर्वात प्रथम नियुक्ती दिनांक नमुद नसून आज अखेर पर्यत किती कालावधी झाल्याचा बोध होत नाही.तसेच मा.शासन,सामान्य प्रशासक विभाग ,शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.-२००५ /प्र.क्र.४७ /०५/१२ दि.२५ ऑगस्ट २००५ मधील परिच्छेद क्र.५ मध्ये सर्व पदावरील नियुक्या विहीत मार्गाने /माध्यमा मार्फत करण्याची दक्षता घ्यावी.अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या/अस्थायी नियुक्या कराव्या लागल्यावर तर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी.असे नमुद केले आहे.

प्रस्तावीत वायरमन यापदी पुढील मुदत वाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकाचे अवलोकन करून उचित कार्यवाही करावी.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,विद्युत विभागातील सेवा अत्यावश्यक असल्या कारणाने मुलेप यांचे अभिप्रायनुसार मा.स्थायी समिती मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,मा.स्थायी समिती कडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर

--**--

**<u>ऑनलाईन V.C. चर्चा :-</u>**

विषय पत्रिकेतील विषय क्रमांक २४ मध्ये झालेल्या चर्चे नुसार

मा.सौ.सोनाबाई शिंदे :- विषय क्रमांक २४ ते २९ मंजूर करण्यात यावे.

मा.सौ.वंदना ताठे :- विषय क्रमांक २४ ते २९ चे ऑफिस रिपोर्ट मंजूर करावेत.

मा.सभापती साहेब :- श्री.सुभाष बापुराव सुळ व इतर यांची इलेक्ट्रीक विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी त्यांना तीन दिवसांचा तात्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे रूपये १४,२५०/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार श्री.सुभाष बापुराव सुळ व इतर यांची इलेक्ट्रीक विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी त्यांना तीन दिवसांचा तात्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे रूपये १४,२५०/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ.सोनाबाई शिंदे सही/-

अनुमोदक :- मा.सौ.वंदना ताठे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०२**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

विषय क्रमांक- २९ गुरूवार दि. ०३/०६/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका पाणीपुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (मॅकेनिकल ) यापदी १] राहुल सदाशिव गिते, २] प्रदिप सदाशिव ढगे व (सिव्हील ) यापदी स्नेहल राजेंद्र मुळे यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

**संदर्भ-** १. पाणी पुरवठा विभाग यांचेकडील जा.क्र. पाणी पुरवठा विभाग ९७० दि.०४/०३/२०२१ अन्वेयचा प्रस्ताव

२. पाणी पुरवठा विभाग यांचेकडील जा.क्र. पाणी पुरवठा विभाग ९७१ दि.०४/०३/२०२१ अन्वेयचा प्रस्ताव

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पाणी पुरवठा विभाग यांनी त्यांचेकडील जा.क्र. पाणीपुरवठा विभाग ९७० व ९७१ दि.०४/०३/२०२१ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये पाणी पुरवठा विभागाकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी स्नेहल राजेंद्र मुळे यांची दि.०५/०९/२०२० ते ०४/०३/२०२१ अखेर असून त्यांची मुदत दि.०५/०३/२०२१ पासून समाप्त होत असल्याने व तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (मॅकेनिकल) यापदी १) राहुल सदाशिव गिते २) प्रदिप सदाशिव ढगे यांची दि.१९/०१/२०२० ते १८/०३/२०२१ अखेर असून त्यांची मुदत दि.१९/०३/२०२१ पासुन समाप्त होत असल्याने त्यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननियुक्त्‌ी करणेबाबत सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये मा.स्थायी समिती ठराव क्र.५१ दि.११/११/२०२०अन्वये पुर्व मंजूरी पारीत ठरावाच्या अनुषंगाने जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणुक ६८ दि.०८/०१/२०२१ अन्वये पाणी पुरवठा विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी स्नेहल राजेंद्र मुळे यांची रू.२५०००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून दि.०५/०३/२०२० पासुन सहा महिन्याकरीता व जा.क्र.आस्था करारबध्द नेमणूक ६९ दि.०८/०१/२०२१ अन्वये तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (मॅकेनिकल) यापदी १) राहुल सदाशिव गिते २) प्रदिप सदाशिव ढगे यांची रू.२५०००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्तीप्रमाणे तांत्रिक खंड देवून दि.१९/०९/२०२० पासुन सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असून सदरच्या कालावधीतील केलेल्या करारबध्द मानधनावरील श्रीमती मुळे यांची नियुक्त्‌ीची मुदत दि.०५/०३/२०२१ रोजी पासुन समाप्त झालेली असून श्री.गिते व ढगे यांची दि.१९/०३/२०२१ पासून नियुक्ती मुदत ही समाप्त होणार आहे.

तरी वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ च्या तरतुदीनुसार पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार १) स्नेहल राजेंद्र मुळे २) राहुल सदाशिव गिती ३) प्रदिप सदाशिव ढगे यांची तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) व (मॅकेनिकल) यापदी तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे रूपये २५,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणेकामी निर्णयासाठी सादर करणेकरीता मा.मुख्यलेखाधिकारी व मा.मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय होवून सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" नुसार पाणीपुरवठा विभागाची गरज पहाता मा.स्थायी समिती मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,मुलेअ व मुलेप यांचा अभिप्राय घेण्यात यावा.

यावर लेखापरिक्षक / मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मा.शासन,सामान्य प्रशासक विभाग ,शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.-२००५ /प्र.क्र.४७ /०५/१२ दि.२५ ऑगस्ट २००५ मधील परिच्छेद क्र.५ मध्ये सर्व पदावरील नियुक्या विहीत मार्गाने /माध्यमा मार्फत करण्याची दक्षता घ्यावी.अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या/अस्थायी नियुक्या कराव्या लागल्यावर तर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी.असे नमुद केले आहे.

प्रस्तावीत कनिष्ठ अभियंता यापदी पुढील मुदत वाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकाचे अवलोकन करून उचित कार्यवाही करावी.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, "अ" मध्ये प्रस्तावित केल्यानुसार मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती चा प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर

--**--

**<u>ऑनलाईन V.C. चर्चा :-</u>**

विषय पत्रिकेतील विषय क्रमांक २४ मध्ये झालेल्या चर्चे नुसार

मा.सौ.सोनाबाई शिंदे :- विषय क्रमांक २४ ते २९ मंजूर करण्यात यावे.

मा.सौ.वंदना ताठे :- विषय क्रमांक २४ ते २९ चे ऑफिस रिपोर्ट मंजूर करावेत.

मा.सभापती साहेब :- पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार १) स्नेहल राजेंद्र मुळे २) राहुल सदाशिव गिती ३) प्रदिप सदाशिव ढगे यांची तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) व (मॅकेनिकल) यापदी तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे रूपये २५,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्ट नुसार पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार १) स्नेहल राजेंद्र मुळे २) राहुल सदाशिव गिते ३) प्रदिप सदाशिव ढगे यांची तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) व (मॅकेनिकल) यापदी तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे रूपये २५,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ.सोनाबाई शिंदे सही/-

अनुमोदक :- मा.सौ.वंदना ताठे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०२**
**(ऑनलाईन झुम अ‍ॅप व्दारे)**

विषय क्रमांक- ३० गुरूवार दि. ०३/०६/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागामध्ये श्री.सागर मनोहर उबाळे व श्री.राजेंद्र रामआसरे जैसवाल यांची कंत्राटी तांत्रीक सहाय्यक या पदावर तसेच संजय हिरामण नागापुरे यांची पंपचालक या पदावर तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर नियुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग

**संदर्भ-** १) श्री.सागर मनोहर उबाळे व राजेंद्र रामआसरे जैसवाल यांचे दि.१५/०९/२०२० अन्वये विनंती अर्ज.
२) श्री.संजय हिरामण नागापुरे यांचा दि.१३/०५/२०२० रोजीचा अर्ज.

विषयांकित बाबत संदर्भ क्र.१ अन्वये सागर मनोहर उबाळे व श्री.रोजेंद्र रामआसरे जैसवाल यांचे संदर्भिय विनंती अर्ज इकडेस प्राप्त असून सदर अर्जामध्ये त्यांनी आम्ही पाणी पुरवठा विभागामध्ये कंत्राटी तत्वावर तांत्रिक सहाय्यक यापदावर यापुर्वी काम केलेले आहे.तसेच सध्या पाणी पुरवठा विभागात कंत्राटी सहाय्यक या पदाची आवश्यकता आहे असे आम्हाला समजले.तसेच आमची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असून आम्हाला कामाची गरज आहे.तरी आम्हाला पाणी पुरवठा विभागामध्ये तांत्रीक सहाय्यक यापदावर नियुक्ती आदेश मिळावेत त्यासाठी दि.०१/०२/२०१४ ते ३१/०७/२०१४ व दि.१०/०२/२०१५ ते दि.०९/०८/२०१५ या कालावधीत महानगरपालिकेकडे काम केल्याचे प्रमाणपत्र सोबत जोडून विनंती केलेली आहे.

तसेच संदर्भ क्र.२ अन्वये श्री.संजय हिरामण नागापुरे यांनी विनंती अर्ज देवून पाणी पुरवठा विभागामध्ये पंपचालक या पदावर मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात कार्यरत होतो.माझी कामाची मुदत दि.०७/०८/२०१६ रोजी संपुष्टात आलेली आहे.मला पाणी पुरवठा विभागामध्ये पुन्हा काम करण्याची इच्छा आहे.तरी मला सेवेमध्ये पुढील मुदतवाढ मिळावी अशी विनंती केलेली आहे.

या अनुषंगाने अहवाल सादर की,पाणी पुरवठा विभागा करिता तांत्रीक कर्मचा-यांची आवश्यकता विचारात घेवून सन २०१४ मध्ये आस्थापना विभागामार्फत एकुण ५ तांत्रीक सहाय्यकांची तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर नियुक्ती करण्यात आलेली होती.यामध्ये संदर्भिय अर्जदार यांचा समावेश होता.

तद्नंतर उर्वरीत ३ तांत्रीक सहाय्यकांचे पुनश्च नेमणुकी बाबती मा.स्थायी समिती समोर केलेली मागणी मा.स्थायी समिती ठराव क्र.१४३ दि.२८/०१/२०२० अन्वये पारीत ठराव व पारीत ठरावाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करणेसाठी मा.आयुक्त यांची प्रशासकीय मंजूरी घेवून इकडील जा.क्र.शहर पा.पु.१४७ दि.१९/०६/२०२० अन्वये तात्पुरत्या स्वरूपात पदावर अटी व शर्ती प्रमाणे १) श्री.संतोष छबु भालेराव २) श्री.आशिष रमेश शेलार ३) इम्रान अयुब खान यांची तांत्रिक सहाय्यक या पदावर दरमहा रू.१०,०००/- प्रमाणे ६ महिन्याकरीता नेमणूक करण्यात आलेली आहे.

तसेच पुंड संदिप प्रभाकर ,सागर दिलीप जाधव व गहिनीनाथ अंबादास मेने या तीघांची आस्थापना विभागामार्फत कंत्राटी पध्दतीने मानधन तत्वावर नेमणूक /मुदतवाढ देणे बाबतची कार्यवाही चालू आहे.

यास्तव विषयांकित खालीलप्रमाणे कार्यवाही करणे उचित राहिल.

१.श्री.सागर मनोहर उबाळे व श्री.राजेंद्र रामआसरे जैसवाल यांचे मागणी विचारात घेता तांत्रिक सहाय्यक यापदावर नेमणूकीसाठी आस्थापना विभागाचा अभिप्राय घेणे

२.श्री.संजय हिरामण नागापुरे यांची पंपचालक या पदावर नेमणुकीसाठी आस्थापना विभागाचा अभिप्राय घणे

३.सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर चर्चे साठी ठेवून मा.स्थायी समितीच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करणे.

तथापी ओदशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर लेखा परिक्षक /मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,कंत्राटी पध्दतीने नेमणूक /मुदतवाढ देणे बाबत प्रस्तावित "अ" प्रमाणे आस्थापना विभागाचे स्वयंस्पष्ट अभिप्राय घेवून फेरसादर करावे.

यावर मा.उपयुक्त (कर) यांची स्वाक्षरी.

यावर सहा.आयुक्त,आस्थापना यांचा अभिप्राय की, उपरोक्त प्रस्तावावरील मा.मुख्य लेखापरिक्षक यांचे दिनांक ११/११/२०२० रोजीच्या शेरांकनानुसार की, अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारित आकृतीबंध व सेवा प्रवेश नियमास महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. अमपा- २०१२/प्र.क्र.३०१(भाग-१) /नवि-२५, मंत्रायल , मुंबई दिनांक ०६ फेबुवारी २०१६ अन्वये अटी व शर्ती नुसार मंजुरी देण्यात आलेली आहे.

सदर आस्थापनेवरील पदांच्या सुधारित आकृतीबंध व सेवा प्रवेश नियमामधील अटी क्र.१] मध्ये सदर अटीची पुर्तता झाल्यानंतर , नवीन आकृतीबंधामुळे उपलब्ध होणारी पदे आस्थापना खर्च विहीत मर्यादेत (३५%) असल्यास विहीत मार्गाने भरता येतील. असे नमुद केलेले आहे. सद्यस्थितीत अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापना वरील खर्चाची टक्केवारी ही ७०% पेक्षा जास्त असल्याने सरळसेवने रिक्त पदांवरील विहीत पध्दतीने भरती प्रक्रिया राबविणेमध्ये अडचणी निर्माण झालेली आहे.

संदर्भिय प्रस्तावामध्ये संबंधीतांची यापुर्वीच नियुक्ती संपुष्टात आलेली असून यापुर्वी पाणीपुरवठा विभागामार्फत तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक सहाय्यक यापदी मानधनावर संबंधीतांची नियुक्तीबाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे.

आस्थापना विभागावरील खर्चाची टक्केवारी ही सद्यस्थितीमध्ये विहीत मर्यादेपेक्षा जादा असल्याने आस्थापना विभागामार्फत संबंधीतांची मानधनावर नियुक्तीबाबत कार्यवाही करता येणार नाही.

तरी पाणी पुरवठा विभाग यांचे प्रस्तावामध्ये नमूद केलेले संबंधितांची पाणीपुरवठा विभागास आवश्यकता असल्यास पाणी पुरवठा विभागाने त्यांचेमार्फत संबंधीत कर्मचारी यांची मानधनावर नियुक्तीबाबत पुढील उचित कार्यवाही करणे आवश्यक होईल.

यावर पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, उपरोक्त मान्येते सादर

यावर लेखा परिक्षक /मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मा. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. एस आर व्ही /२००५/प्र.क्र.४७/०५/१२ दि.२५/८/२००५ आणि दि.९/२/२०१८ मधील निर्देशाचे पालन करून प्रस्तावीत "अ" प्रमाणे कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, चर्चा करा,

यावर मा.उपायुक्त (कर ) यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर

--**--

**<u>ऑनलाईन V.C. चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागामध्ये श्री.सागर मनोहर उबाळे व श्री.राजेंद्र रामआसरे जैसवाल यांची कंत्राटी तांत्रीक सहाय्यक या पदावर तसेच संजय हिरामण नागापुरे यांची पंपचालक या पदावर तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर नियुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.शहराचा पाणीपुरवठा वारंवार विस्कळीत होत आहे.वरील पदे भरली परंतु इंजिनीयर सध्या किती आहे.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.सातपुते :- सध्या संपुर्ण शहराचा पाणीपुरवठा पहाणे कामी आस्थापना सुची वरील इंजीनियर्स ची तीन पदे कार्यरत आहेत.व मानधावर तीन इंजीनियर आहेत.आणखी अभियंत्यांची आवश्यकता आहे.सध्या काम सुरळीत होणे करीता अभियंत्यांची मनधनावर नियुक्ती करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- माझ्या कडे श्री.रोहन नितीन इंगळे व श्री.सुरज ए.काकडे या दोन अभियंत्यांनी अर्ज देवून अहमदनगर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडे मानधनावर नियुक्ती मिळणे बाबत अर्ज प्राप्त झाले आहेत.दोन्ही अर्जदार बी.ई.मेकॅनिकल असून होतकरू असून त्यांना कामाची अत्यंत आवश्यकता आहे.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- शहराचा पाणी पुरवठा सुरळीत होणे कामी मा.सभापतींकडे प्राप्त झालेल्या अर्जा नुसार श्री.रोहन नितीन इंगळे व श्री.सुरज ए.काकडे या दोन अभियंत्यांची मानधनावर नियुक्ती करण्यात यावी व ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.सोनाबाई शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा व सभेमध्ये प्राप्त अर्जा नुसार श्री.रोहन नितीन इंगळे व श्री.सुरज ए.काकडे या दोन अभियंत्यांची मानधनावर नियुक्ती करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार १) सागर मनोहर उबाळे २) श्री.राजेंद्र रामआसरे जैसवाल यांची तांत्रिक सहाय्यक यापदी तसेच १) श्री.संजय हिरामन नागापुरे यांची पंपचालक यापदी तात्पुरत्या स्वरूपात सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे दरमहा मानधनावर नियुक्ती बाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.सभेमध्ये प्राप्त अर्ज व झालेल्या चर्चे नुसार श्री.रोहन नितीन इंगळे व श्री.सुरज ए.काकडे या दोन अभियंत्यांची पाणीपुरवठा विभागामध्ये तात्पुरत्या स्वरूपात मानधावर नियुक्ती करण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार १) सागर मनोहर उबाळे २) श्री.राजेंद्र रामआसरे जैसवाल यांची तांत्रिक सहाय्यक यापदी तसेच १) श्री.संजय हिरामन नागापुरे यांची पंपचालक यापदी तात्पुरत्या स्वरूपात सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे दरमहा मानधनावर नियुक्ती बाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. सभेमध्ये प्राप्त अर्ज व झालेल्या चर्चे नुसार श्री.रोहन नितीन इंगळे व श्री.सुरज ए.काकडे यांची पाणीपुरवठा विभागामध्ये कनिष्ठ अभियंता यापदी तात्पुरत्या स्वरूपात सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे दरमहा मानधनावर नियुक्तीस मान्यता देण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- डॉ.मा.श्री.सागर बोरूडे सही/-

अनुमोदक :- मा.सौ.सोनाबाई शिंदे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०२**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

विषय क्रमांक- ३१ गुरूवार दि. ०३/०६/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका शहर पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता मानधनावर नियुक्ती केलेले श्री. काळे सोमनाथ केशव, पाईप फिटर व श्री. अक्षय पोपट पवार, पाईप फिटर यांना तांत्रिक खंड देवुन मुदतवाढ देणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

**संदर्भ-** १. मा.स्थायी समिती सभा विषय क्र.१४३ दि.२८/०१/२०२० अन्वये पारित ठराव
२. जा.क्र.शहर पा.पु.४२५ दि.२९/९/२०२० अन्वये कार्यालयीन आदेश
३. मानधनावरील पाईप फिटर श्री. काळे सोमनाथ केशव व श्री. अक्षय पोपट पवार यांचे दि.०१/०३/२०२१ रोजीचे अर्ज

अहमदनगर महानगरपालिकेच्या शहर पाणी पुरवठा वितरण व्यवस्थे अंतर्गत कर्मचा-यां अभावी निर्माण झालेल्या परिस्थितीचे गांभीर्य विचारात घेवून पाणी पुरवठा विभागाकरीता कायम स्वरूपी पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध होईपर्यत श्री. काळे सोमनाथ केशव व श्री. अक्षय पोपट पवार पाईप फिटर या पदावर मा.स्थायी समिती सभा विषय क्र.१४३ दि.२८/०१/२०२० अन्वये पाणी पुरवठा विभागाकडे तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर ६ महिने कालावधीसाठी दरमहा मानधन किमान रू.१००००/- प्रमाणे जा.क्र. पा.पु. करारबध्द नेमणूक ४२५ दि.२९/९/२०२० अन्वये ६ महिने करिता तात्पुरत्या स्वरूपात नेमणूका करण्यात आलेली होती.

त्यानुसार सदर कर्मचारी दि.२९/९/२०२० पासून पाणी पुरवठा विभागाकडे कार्यरत होते. व सदरचा नेमणूकीचा ६ महिन्याचा कालावधी दि.२८/०३/२०२० रोजी संपलेला आहे. संदर्भ क्र.३ अन्वये वरील कर्मचारी यांनी पुन्हा काम करण्याची इच्छा असून मुदतवाढ मिळावी अशी विनंती केलेली आहे.

या अनुषंगाने अहवाल सादर की, शहर पाणी पुरवठा विभाग वितरण व्यवस्थे करीता कर्मचा-यांची तीव्र निकड आहे. त्यासाठी वरील नमुद कर्मचारी यांना मा.स्थायी समितीचे मंजूरीने तांत्रिक खंड देवुन मुदतवाढ देणे आवश्यक व क्रमप्राप्त आहे.

शहर पाणीपुरवठा विभाग वितरण व्यवस्थे करीता वरील नमुद तांत्रिक कर्मचा-यांची तीव्र निकड आहे. त्यासाठी श्री. काळे सोमनाथ केशव व श्री. अक्षय पोपट पवार पाईप फिटर यांना मा.स्थायी समितीचे मंजूरीने तांत्रिक खंड देवून मुदतवाढ देणे आवश्यक व क्रमप्राप्त आहे.

यास्तव पाणपीपुरवठा विभागाकरीता मोठया प्रमाणात तांत्रिक कर्मचा-यांची आवश्यकता असल्याने कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वरील नमूद तांत्रिक हुददयाप्रमाणे वरील नमूद कर्मचा-यांना नियमानुसार तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवून मुदतवाढ देणेकरिता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे मंजुरीसाठी पाठविणे संयुक्तीक राहील. तथापी आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे वरिष्ठ लिपिक यांचा अहवाल असे.

यावर पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, अहवालॉन्वय मान्यतेनेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर

--**--

**<u>ऑनलाईन V.C. चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका शहर पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता मानधनावर नियुक्ती केलेले श्री. काळे सोमनाथ केशव, पाईप फिटर व श्री. अक्षय पोपट पवार, पाईप फिटर यांना तांत्रिक खंड देवुन मुदतवाढ देणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.सोनाबाई शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार १) श्री. काळे सोमनाथ केशव २) श्री. अक्षय पोपट पवार यांची पाईप फिटर यापदी तात्पुरत्या स्वरूपात सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे दरमहा मानधनावर नियुक्ती बाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्ट नुसार पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार १पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार १) श्री. काळे सोमनाथ केशव २) श्री. अक्षय पोपट पवार यांची पाईप फिटर यापदी तात्पुरत्या स्वरूपात सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे दरमहा मानधनावर नियुक्ती बाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.रविंद्र बारस्कर सही/-

अनुमोदक :- मा.सौ.सोनाबाई शिंदे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्र. ०२ (ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

विषय क्रमांक- ३२ गुरूवार दि. ०३/०६/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार मालमत्ताधारक श्री. हरिश्र्चंद विठठल लेकुरवाळे , रा. पितळे कॉलनी नागापुर ,अ.नगर यांना प्रभाग क्र. १ वॉर्ड क्र.७२/अ बिल नं. ३१८ मालमत्ता क्रमांक Z१७२/A०३१९०९ यांचे दुबार बिलाची रक्कम शास्तीसह निर्लेखित मंजूर करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.१ अंतर्गत नागारपुर उपकार्यालय.

विनंती रिपोर्ट नागापुर उपविभाग वसुली लिपीक वॉर्ड ७२/अ यांजकडून देण्यात येते की,अर्जदार श्री.हरिशचंद्र विठ्ठल लेकुरवाळे रा.गुंदेचा कॉलनी नागापुर यांनी आपली एकच मिळकत असुन एकाच मिळकतीची ओपन प्लॉट व बांधकामाच्या आकारणीची दोन बीले येत असल्याने मोकळया जागेची आकारणीचे बील रद्द करणेबाबत अर्ज मनपा कडे दाखल केला आहे.

त्याकरीता अर्जदार यांचे अर्जानुसार व समक्ष स्थळी पहाणी केली असता अर्जदार यांची मिळकत नावे हरिशचंद्र विठ्ठल लेकुरवाळे ही एकच मिळकत असुन सदर मिळकतीची मोकळया जागेची वॉर्ड नं.७२/अ बील नं.४५३ वर घेण्यात आलेली आहे. तसेच अर्जदार यांनी वॉर्ड नं.७२/अ ४५३ Z१७२/A०३२१८९ ची पा.नं.AMC२०२१६६००२३५३दि. २६/११/२०२० ने रू.३७०१/-सन २०२०-२१ अखेर संपुर्ण कराचा भरणा केला आहे.

त्याकरीता अर्जदार यांचे अर्जानुसार मोकळया जागेची मिळकत नावे हरिशचंद्र विठ्ठल लेकुरवाळे वॉर्ड नं.७२/अ बील नं.३१८ ची सन २०२०-२१ अखेर रू.१०४७१ /- + शास्ती ची रक्कम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९मधील अनुसुची ड मधील प्रकरण ८ कराधान नियम २०(१) (ड)(क) नुसार मोकळया भुखंडाची नोंद रद्द करणे विषयी आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे वसुली लिपीक यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार मालमत्ता धारक हरिशचंद्र विठ्ठल लेकुरवाळे यांची एकाच मालमत्ता असून नजरचूकीने त्याच्या मालमत्तेची दोन बीलावर नोंद घेण्यात आली असल्याने डबल नोंद असलेले बील क्र.३१८ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण नियम २०(१) (ड)(क) अन्वये रद्द करणे उचीत वाटते तथापी आदेशार्थ सादर.

यावर प्रभाग आधिकारी यांचा अभिप्राय की,कर निरीक्षक याच्या अभिप्राय,कागदपत्रांची केलेली खातरजमा व वसुली लिपीक यांच्या प्रस्तावानुसार चुकीची दुबार केलेली कर आकारणी कमी करणे उचित वाटते.

यावर रिव्हीजन विभाग यांचा अभिप्राय की,विभागाने प्रस्तावित केल्यानुसार सन २००३/०४या वर्षात झालेल्या रिव्हीजन मध्ये श्री.लेकुरवाळे यांची नोंद असतांना परत प्लॉट क्र.४६ ची नोंद लेकुरवाळे यांच्या नावे नोंद केलेली आहे.त्यावेळेस संबंधीत रिव्हीजन ऑफिसर यांनी जागेबाबत खात्री न करता नोंद घेतलेली दिसुन येते.लेकुरवाळे यांची नोंद प्लॉट क्र.५२ वर आहे.त्यामुळे मा.क्र.z१७२/A०३१९०९ हि ओपन प्लॉटची नोंद डबल झालेली दिसुन येते.त्यामुळे सदर नोंद रद्द करणे साठी या बीलातील रक्कम निर्लेखित करणे आवश्यक आहे.तथापी महाराष्ट्र महानगरपालिका कलम १५२ नुसार मा.स्थायी समितीच्या मान्यतेसाठी सदर प्रस्ताव स्थायी समितीक डे पाठविणे विषयी आदेशार्थ सादर.

यावर सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत अ प्रमाणे मा.स्थायी समितीच्या मान्यतेसाठी आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे मान्यतेसाठी

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर

--**--

**ऑनलाईन V.C. चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार मालमत्ताधारक श्री. हरिश्र्चंद विठठल लेकुरवाळे , रा. पितळे कॉलनी नागापुर ,अ.नगर यांना प्रभाग क्र. १ वॉर्ड क्र.७२/अ बिल नं. ३१८ मालमत्ता क्रमांक Z१७२/A०३१९०९ याचे दुबार बिलाची रक्कम शास्तीसह निर्लेखित मंजूर करणे बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.सौ.सोनाबाई शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा. खुल्या जागेवर ओपन जीम विकसीत करणे करीता क्रीडा साहित्या करीता महानगरपालिकेस कोणताही आर्थिक भुर्दंड पडणार नसल्याने वरील प्रभागातील नागरिकांमध्ये व्यायामाची आवड निर्माण व्हावी या उददेशाने सध्या कोणत्याही वापरात नसलेल्या मनपाच्या मालकीच्या जागे मध्ये व्यायाम साहित्य बसविणे व मैदाने विकसीत करणे करीता मा.स्थायी समिती ची मान्यते बाबतचा ठराव जिल्हा क्रीडा अधिकारी यांना पाठविण्यात यावा.

मा.सौ.वंदना ताठे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा. मनपाच्या मालकीच्या जागे मध्ये व्यायाम साहित्य बसविणे व मैदाने विकसीत करणे करीता मा.स्थायी समिती ची मान्यते बाबतचा ठराव जिल्हा क्रीडा अधिकारी यांना पाठविण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अर्जदार मालमत्ताधारक श्री. हरिश्र्चंद विठठल लेकुरवाळे , रा. पितळे कॉलनी नागापुर ,अ.नगर यांना प्रभाग क्र. १ वॉर्ड क्र.७२/अ बिल नं. ३१८ मालमत्ता क्रमांक Z१७२/A०३१९०९ यांचे दुबार बिलाची सन २०२०-२१ अखेर रू.१०४७१ /- निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार मनपा हद्दीतील मध्ये मनपा सर्व्हे क्र.२३९साईराम सोसायटी जवळ कल्याण रोड , अहमदनगर, मनपा सर्व्हे क्र.२३० गणेश नगर जवळ, कल्याण रोड, अहमदनगर , मनपा सर्व्हे क्र.२४३, जिजाउनगर जवळ , कल्याण रोड अहमदनगर,मनपा सर्व्हे क्र.११/१/२/जाधव नगर जवळ, कल्याण रोड,अहमदनगर, मनपा सर्व्हे क्र.४/१,अमित नगर जवळ,कल्याण रोड, वरील जागेवर उपरोक्त क्रीडा साहित्या करीता महानगरपालिकेस कोणताही आर्थिक भुर्दंड पडणार नसल्याने वरील प्रभागातील नागरिकांमध्ये व्यायामाची आवड निर्माण व्हावी या उददेशाने सध्या कोणत्याही वापरात नसलेल्या मनपाच्या मालकीच्या जागे मध्ये व्यायाम साहित्य बसविणे व मैदाने विकसीत करणे करीता मान्यता देण्यात येत आहे व वरील सर्व प्रस्ताव तयार करून जिल्हा क्रीडा अधिकारी यांना पाठविण्यास हि सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** अर्जदार मालमत्ताधारक श्री. हरिश्र्चंद विठठल लेकुरवाळे , रा. पितळे कॉलनी नागापुर ,अ.नगर यांना प्रभाग क्र. १ वॉर्ड क्र.७२/अ बिल नं. ३१८ मालमत्ता क्रमांक Z१७२/A०३१९०९ यांचे दुबार बिलाची सन २०२०-२१ अखेर रू.१०४७१ /- निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार मनपा हद्दीतील मध्ये मनपा सर्व्हे क्र.२३९साईराम सोसायटी जवळ कल्याण रोड , अहमदनगर, मनपा सर्व्हे क्र.२३० गणेश नगर जवळ, कल्याण रोड, अहमदनगर , मनपा सर्व्हे क्र.२४३, जिजाउनगर जवळ , कल्याण रोड अहमदनगर,मनपा सर्व्हे क्र.११/१/२/जाधव नगर जवळ, कल्याण रोड,अहमदनगर, मनपा सर्व्हे क्र.४/१,अमित नगर जवळ,कल्याण रोड, वरील जागेवर उपरोक्त क्रीडा साहित्या करीता महानगरपालिकेस कोणताही आर्थिक भुर्दंड पडणार नसल्याने वरील प्रभागातील नागरिकांमध्ये व्यायामाची आवड निर्माण व्हावी या उददेशाने सध्या कोणत्याही वापरात नसलेल्या मनपाच्या मालकीच्या जागे मध्ये व्यायाम साहित्य बसविणे व मैदाने विकसीत करणे करीता मान्यता देण्यात येत आहे व वरील सर्व प्रस्ताव तयार करून जिल्हा क्रीडा अधिकारी यांना पाठविण्यास हि सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ.सोनाबाई शिंदे सही/-

सही/-

अनुमोदक :- मा.सौ.वंदना ताठे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०२**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

विषय क्रमांक- ३३ गुरूवार दि. ०३/०६/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** कोरोना विषाणु (कोव्हीड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेसाठी शासकीय तंत्रनिकेतन विद्यालय वसतिगृह कोव्हीड सेंटर येथे नवीन विद्युत व्यवस्था व दुरूस्ती करणेकामी झालेल्या रक्कम रूपये १,८५,८१३/- च्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका विदयुत विभाग

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरून विनंती रिपोर्ट की, मा.महाराष्ट्र राज्य शासनाने कोरोना विषाणुचा (कोव्हीड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग अधिनियम १८९७ दि.२३ मार्च २०२० पासुन लागु करून खंड २,३,४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमीत केलेली आहे. त्या अन्वये मा.आयुक्त हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हीड-१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणुन घोषीत करण्यात आलेले आहेत.

त्यानुसार कोरोना विषाणु (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी शासकीय तंत्र निकेतन विद्यालय येथे कोव्हीड सेंटर सुरू करणे गरजेचे होते. परंतु त्या ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी केली असता त्या ठिकाणाच्या वसतिगृहामध्ये नवीन विदयुत व्यवस्था करणे व जुनी व्यवस्था दुरूस्त करणे गरजेचे होते. (नवीन टयुब लाईट फिटींग, नवीन स्ट्रीट लाईट बसविणे, फॅनची व स्विच बोर्डची तसेच वायरिंगची दुरूस्ती करणे)

मा.आयुक्त साहेब व विदयुत विभाग प्रमुख यांचे तोंडी आदेशान्वये शासकीय तंत्र निकेतन विद्यालय वसतिगृह कोव्हीड सेंटर कार्यान्वीन होवुन तेथे रूग्ण दाखल झालेले असल्याने तातडीने विदयुत व्यवस्था दुरूस्त करणे गरजेचे असल्याने व सदरहु काम तातडीचे असल्याने मे. रमा विजया इलेक्ट्रीकल्स, अहमदनगर यांचेकडून काम करून घेण्यात आले होते. सा.बां.विभागाच्या (विदयुत) सन २०१९-२०२० च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रू.२,१८,६८८/- तयार करण्यात आले तसेच बाजार दराप्रमाणे दरपत्रके मागवुन दोन्ही दरांची तुलना करून दोन्ही दरामधील कमी दराप्रमाणे सदर कामासाठी रक्कम रू.१,८५,८१३/- फक्त खर्च झालेला आहे.

महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७(३) क अन्वये मा.आयुक्त यांचे अधिकारामध्ये मे. रमा विजया इलेक्ट्रीकल्स, अहमदनगर या संस्थेकडून काम करून घेतल्या कामी त्यांचे बील रक्कम रू.१,८५,८१३/- (अक्षरी रूपये एक लक्ष एक्कयाऐंशी हजार चारशे चोवीस मात्र) च्या खर्चास व कामास कार्योत्तर मंजुरी मिळणेस्तव सविनय सादर व सदर खर्चा विषयीची प्रतीवृत्त मा.स्थायी समितीकडे पाठविण्यास सविनय सादर./ अ

सोबत-

१] सा.बां. विभागाच्या (विदयुत) सन-२०१९-२०२० च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रू.२,१८,६८८/-

२] बाजार भावाप्रमाणे दर पत्रके

३] बाजार भाव व सा.बां. विभाग दर सुची दर यांचा तुलनात्मक तक्ता

४] मे. रमा विजया इलेक्ट्रीकल्स, अहमदनगर यांचे बिल क्र.१६ दि.०४/०३/२०२१ रक्कम रू.१,८५,८१३/-

५] कामाचे फोटो

६] मा.आयुक्त साहेब यांचा कार्यालयीन आदेश

अंदाजपत्रकीय तरतुद- सन २०२०-२०२१
लेखाशिर्ष- कोव्हीड-१९ (२०-२१)
तरतुद- रू. ३ कोटी
आतापर्यत झालेला खर्च- रू.८८,९०,२४८/-
प्रस्तावीत खर्च- रू.१,८५,८१३/-
एकुण खर्च- रू.९०,७६,०६१/-
उपलब्ध शिल्लक- रू.२,०९,२३,९३९/-
प्रस्तावीत बजेट रजिस्टर पा.नं. २४ अ.नं. ७१ वर नोंद असे.

येणेप्रमाणे कनिष्ठ अभियंता, कनिष्ठ अभियंता, विदयुत विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर लेखापरिक्षक / मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की. कार्यालयीन आदेश जा.क्र. सा.प्र.वि.३३४ दि.२१/७/२०२१ च्या पत्रान्वये विदयुत विभागाचे काम समाधानकारक झालेबाबत प्रमाणपत्र सादर केले नाही महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६७(३) क नुसार मागील पृष्ठ क्र.१ मधील "अ" नुसार विभागाने प्रस्तावीत केलेनुसार कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.सहाय्यक आयुक्त (कर) यांचा अभिप्राय की, मुलेप व मुलेअ यांच्या अभिप्रायानुसार कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, महानगरपलिका अधिनियम १९४९ मधील कलम ६७(३) क नुसार व वर्कऑर्डर, करारनामा करून ९०% रक्कम खर्च करू शकते व उर्वरित १०% साठी स्थायीची मान्यता आवश्यक असते प्रकरणांत कार्यारंभ आदेश दिसत नाहीत. फेरसादर करा.

यावर विदयुत विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, फेरसादर, उपरोक्त विषयान्वये कोरोना विषाणु कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी शासकीय तंत्रनिकेतन विदयालय येथे कोव्हीड सेंटर सुरू करण्यात आले होते. सदर ठिकाणी नवीन विदयुत व्यवस्था करणे व जुनी विदयुत व्यवस्था दुरूस्त करणे गरजेचे असल्याने व मा.आयुक्त यांनी सुचित केल्याप्रमाणे महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७(३) क अन्वये मा.आयुक्त यांचे अधिकारामध्ये शासन नोंदणीकृत विदयुत व सदर कामाचा अुभव असलेले ठेकेदार मे. रमा विजया इलेक्ट्रीकल्स , अहमदनगर यांचेकडून काम करून घेण्यात आले आहे. सदर कामाचे देयक रक्कम रू.१,८५,८१३/- च्या खर्चास व कामास कार्योत्तर मंजुरीस्तव व सदर खर्चा विषयीची प्रतीवृत्त मा.स्थायी समितीकडेस पाठविणे सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, समक्ष चर्चा करा, चर्चा केली मान्यतेसाठी

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑनलाईन V.C. चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- कोरोना विषाणु (कोव्हीड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेसाठी शासकीय तंत्रनिकेतन विद्यालय वसतिगृह कोव्हीड सेंटर येथे नवीन विद्युत व्यवस्था व दुरूस्ती करणेकामी झालेल्या रक्कम रूपये १,८५,८१३/- च्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- महानगरपालिकेने मध्यंतरी बुथ हॉस्पीटल चे नुतनीकरण करण्याकरीता पैसे दिले.त्यानंतर सुध्दा पैसे दिले.आता तंत्रनिकेतनलाही देतोय.हे नागरीकांच्या सोई -सुविधांकरीता देण्या बाबत कोणाचे काही दुमत नाही.सर्व नगरसेवकांचा याला पाठींबा आहे.जसे नगरशहराचे

मा.आ.संग्रमभैय्या साहेब असतील तुम्ही व विरोधी पक्ष नेते असतील यांनी मागे मागणी केली होती की,महानगरपालिकेचे एक अदयावत रूग्णालय असावे.जेणे करून आपल्याला हे दुस-यांच्या ठिकाणी ,म्हणजे आपण नटराट हॉटेल येथे सुध्दा तेथील दुरूस्ती व बाकीच्या गोष्टींसाठी खर्च केला आहे.जर महानगरपालिकेच्या मालकीची इमारत केली तर आणि हा झालेला खर्च कायम स्वरूपी राहणार आहे.येणा-या तीस-या लाटेच्या अनुषंगाने असे केले तर ते योग्य होईल.त्या दृष्टीने या गोष्टी चांगल्या होतील.मा.सभापती साहेब माझी आपणास विनंती आहे की,आपण प्रशासनाची एखादी मिटींग घेवून सावेडी प्रभागामध्ये असेल किंवा एखादे प्रायव्हेट बंद झालेले एम्स हॉस्पीटल,ती बॅक विकण्यास इच्छुक आहे.असे जर आपण काही केले तर एखादे अदयावत हॉस्पीटल उपलब्ध झाले तर आपल्याला अत्यंत चांगले होईल.आपल्याला कायम स्वरूपी हॉस्पीटल रूग्णांकरीता होईल.सध्या जो वेगवेगळया ठिकाणी खर्च होत आहे.तो नंतर वाया जाणार आहे.आपल्या वास्तुमध्ये आपण जर खर्च केला तर तो वाया जाणार नाही.महानगरपालिकेच्या मालकीचे अदयावत रूग्णालय होईल या बाबत प्रशासनाने लक्ष घालावे.कोवीड बरोबर आपण इतरही सुविधा आपणाला देता येतील.इतर महानगरपालिकेंचे सर्वाचे अदयावत रूग्णालय आहेत.आपली महानगरपालिका ड वर्ग आहे मान्य आहे.परंतु आपण सुध्दा नागरीकांना बेसीक सुविधा दिली पाहिजे.आज शहरामध्ये असे बरेच नागरीक आहेत की त्यांची परिस्थीती हालाकीची आहे.हॉस्पीटल मध्ये जाण्याची त्यांची आर्थिक परिस्थीती नाही.सिव्हील हॉस्पीटल मध्ये खुप लोड आहे.त्याठिकाणी उपचार घेण्या करीता खुप अडचणी येतात.महानगरपालिकेचे हॉस्पीटल झालेतर नागरीकांची व कामगार वर्गाची सोय होईल.मी आपल्याला व प्रशासनाला विनंती करीतो की,हॉस्पीटलच्या विषयामध्ये आपण लक्ष घाला.वरच्या पातळीवर काही निधी उभारणी करीता पाठपुरावा मा.आ.संग्राम भैय्या जगताप यांचे कडे करता येईल.

मा.सभापती साहेब :- हा मुद्दा मीच मांडला होता, शहर सहकारी बॅकेमध्ये माझी सभापती पदावर निवड झाल्यानंतर मला शहर बॅकेमध्ये सत्कारा करीता आमंत्रित केले होते.त्यावेळी त्यांनी मला सांगीतले होते.आम्हाला एम्स हॉस्पीटल विकायचे आहे.त्यावेळी माझी.मा.आयुकत साहेब,मा.उपायुक्त साहेब यांचेशी माझी चर्चा सुध्दा झाली होती.जर आपल्याला रेडी हॉस्पीटल मिळत असेल तर आपल्याला काय अडचण आहे.आपण जे मुद्दे उपस्थीत केले आहेत ते खुप महत्वाचे आहेत.त्यावर आपण नक्कीच प्रशासन असेल, ा.आ.संग्राम भैय्या जगताप असतील,सन्माननीय महापौर साहेब असतील,आपण त्यांच्या चर्चा करू.माझे सुरूवातीपासून धोरण आहे की,महानगरपालिकेचे स्वत:अद्यावत हॉस्पीटल असावे व त्याठिकाणी गोरगरीबांकरीता अत्पदरामध्ये उपचार होतील.आपला प्रयत्न राहिल.तुम्ही आरोग्य कमीटीचे आध्यक्ष आपण महानगरपालिकेचे हॉस्पीटल कसे करता येईल,त्यासाठी आपण नक्की प्रयत्न करू.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- महानगरपालिकेने पुणे,मुंबई महानगरपालीकेच्या धर्तीवर लसीकरणाचे टेंडर काढावे. टेंडर बाबत आपण पाठपुरावा केला का? टेंडर काढून आपल्या पालीकेला स्वतंत्र लसी मागवीता येतील का?या बाबत प्रशासनाकडून खुलासा करण्यात यावा.

उपायुक्त श्री.डांगे :- महानगरपालीकेचे हॉस्पीटल असावे चा आयुर्वेद हॉस्पीटल येथे २४ बेडचे हॉस्पीटल बुक केले आहे. सन फार्मा नावाची कंपनीमार्फत ऑक्सीजन प्लॉन्ट उपलब्ध करून दिलेला आहे. त्या ठिकाणी व्हेंटीलेटर ची सुविधा आहे.महानगरपालिकेचे दुसरे ७४ बेडचे हॉस्पीटल ,ऑक्सीजन सुविधेसह पॅलीटेक्नीकल कॉलेज येथे ६० बेड व जैन पितळे होस्टेल येथे ७४ बेड करीता ऑक्सीजन पाईल लाईनच्या निविदा आहेत .त्यांना आपण वर्कऑर्डर देणात आहे.त्याठिकाणी ऑक्सीजनच्या पाईला लाईन करीत आहोत.आपण आपला सुध्दा ऑक्सीजन प्लॉन्ट करत आहे.सर्व साधारणपणे १२५

ऑक्सीजन सिलेंडर दिवसाला भरतील.२४ तासामध्ये ,इतकी त्याची कपॅसिटी आहे.दोन महिन्यामध्ये प्लॅन्ट सुरू होईल. अशा पध्दतीने भविष्यात कोरोनाची लाट आली तर तयारी चालू आहे.काही पेशंट घरत असतील त्यांना ऑक्सीजनची गरज असेल तर त्यांच्या साठी सुध्दा ऑक्सीजन कॉन्सटेंटर लायब्ररी सुरू करणार आहोत.ज्या रूग्णांना आवश्यकता असेल ते महानगरपालिके कडून घेवून जातील व नंतर पुन्हा आणून देतील.सध्या आपल्याकडे १५सेट आहेत.१० लीटर व ७ लीटर कॉन्सट्रेशन मशीन खरेदीच्या अंतीम टप्पयात आहोत.एक महिन्यामध्ये ऑक्सीजन कॉन्सट्रेशनची लायब्ररी तयार होईल.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.सोनाबाई शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :-कोरोना विषाणु (कोव्हीड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेसाठी शासकीय तंत्रनिकेतन विद्यालय वसतिगृह कोव्हीड सेंटर येथे नवीन विद्युत व्यवस्था व दुरूस्ती करणेकामी झालेल्या रक्कम रूपये १,८५,८१३/- च्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार कोरोना विषाणु (कोव्हीड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेसाठी शासकीय तंत्रनिकेतन विद्यालय वसतिगृह कोव्हीड सेंटर येथे नवीन विद्युत व्यवस्था व दुरूस्ती करणेकामी झालेल्या रक्कम रूपये १,८५,८१३/- च्या खर्चास कार्योत्तर मंजूरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.प्रकाश भागानगरे सही/-

अनुमोदक :- मा.सौ.सोनाबाई शिंदे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०२**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

विषय क्रमांक- ३४ गुरूवार दि. ०३/०६/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेस महानगरपालिकेच्या हद्दीत आवश्यकतेनुसार सन २०२१-२२ करिता खाजगी टॅकर्सने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे (जी.पी.एस. यंत्रणेसह) ई- निविदा क्र.६६२५४५ या निविदेच्या मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका पाणीपुरवठा विभाग

**संदर्भ-** १.शासन निर्णय क्र.टंचाई २०१८/प्र.क्र.१६७/ पापु-१४ दि.१९ डिसेंबर २०१८
२. मा.जिल्हाधिकारी ,अ.नगर यांचेकडील दर मान्यतेबाबतचे इतिवृत्त दि.०२/०३/२०२०
३. इकडील पत्र क्र.पा.पु.६४ दि.०५/०५/२०२१

मा.सादर,

उपरोक्त विषयाबाबत खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१. प्रशासकिय मान्यता :- मा.आयुक्त ,अ.नगर याची दिनांक ०६/१०/२०२०
२. ई - निविदा क्रमांक :- ६६२५४५१/सन २०२१-२२ दि.१२/०३/२०२१
३. निविदा विक्री कालावधी :- दि.१२/०३/२०२१ ते दि.०५/०४/२०२१
४. निविदा स्विकारणेची दिनांक :- दि.१२/०३/२०२१ ते दि.०५/०४/२०२१
५. निविदा उघणेचा दिनांक :- दि.०७/०४/२०२१
६. कामाची मुदत :- १२ महिने
७. प्राप्त झालेल्या निविदेचा तपशील दि.०६/०५/२०२१ रोजीच्या मा.छाननी समितीचे शिफारशीनुसार.

| तपशिल | मा.शासन मंजूर दर | मा.जिल्हाधिकारी अ.नगर यांनी मंजूर केलेले दर | निविदाधारकाने निविदेमध्ये दिलेले दर | निविदाधारकाने वाटाघाटीनुसार दिलेले दर |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| प्रती दिन/प्रती मे.टन भाडे = | रू.२७०.००/- | रू.२६२.००/- | रू.२५५.००/- | २४५.००/- |
| प्रती कि.मी./ प्रती मे.टन डिझेल दर= | रू.०३.४०/- | रू.०३.३५/- | रू.०३.३५/- | रू.०३.३५/- |

मे .दिपाली ट्रान्सपोर्ट ,अ.न्रर योचे उक्त रकाना क्र.४ मधील नमुद दर हे स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे आलेले आहेत.सदर दराबाबत संबंधितांस संदर्भिय पत्र क्र.३ नुसार वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले.संबंधित निविदाधारक यांनी वाटाघाटीनुसार रकाना क्र.५ नुसार काम करणेस तयार असलेचे मान्य केले.सदर दराची तुलना रकाना क्र.२ व ३ नुसार केली असता सदरचे दर वाजवी आहेत.त्यामुळे मा.छाननी समितीने रकाना क्र.५ मध्ये नमुदचे दरानुसार काम देणेस शिफारस केलेली आहे.

तरी निविदाधारक मे. दिपाली ट्रान्सपोर्ट ,अ.नगर यांनी व मा.छाननी समितीने शिफारस केलेले रकाना क्र.५ मध्ये दर मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव ठेवणेस आदेशार्थ ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,प्रशासकीय छाननी समितीनी शिफारस केल्यानुसार प्रस्तावित अ प्रमाणे कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर ) यांचा अभिप्राय की,As Proposed for Sanction

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेस महानगरपालिकेच्या हद्दीत आवश्यकतेनुसार सन २०२१-२२ करिता खाजगी टॅंकर्सने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे (जी.पी.एस. यंत्रणेसह) ई- निविदा क्र.६६२५४५ या निविदेच्या मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- ऑफिस रिपोर्ट चे वाचन करा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सौ.वंदना ताठे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- :-अहमदनगर महानगरपालिकेस महानगरपालिकेच्या हद्दीत आवश्यकतेनुसार सन २०२१-२२ करिता खाजगी टॅंकर्सने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे (जी.पी.एस. यंत्रणेसह) ई- निविदा क्र.६६२५४५ या निविदे मधील निविदाधारक मे. दिपाली ट्रान्सपोर्ट ,अ.नगर यांची सर्वात कमी दरावर झालेल्या वाटाघाटी नुसार मा.छाननी समितीने शिफारस केलेल्या दरास मान्यता देण्यात येत आहे.तसेच पुढील कार्यारंभ आदेश होईपर्यत कामास व खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेस महानगरपालिकेच्या हद्दीत आवश्यकतेनुसार सन २०२१-२२ करिता खाजगी टॅंकर्सने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे (जी.पी.एस. यंत्रणेसह) ई- निविदा क्र.६६२५४५ या निविदे मधील निविदाधारक मे. दिपाली ट्रान्सपोर्ट ,अ.नगर यांची सर्वात कमी दरावर झालेल्या वाटाघाटी नुसार मा.छाननी समितीने शिफारस केलेल्या दरास मान्यता देण्यात येत आहे.तसेच पुढील कार्यारंभ आदेश होईपर्यत कामास व खर्चास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ.वंदना ताठे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०२**
**(ऑनलाईन झुम अॅप व्दारे)**

विषय क्रमांक- ३५ गुरूवार दि. ०३/०६/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील उनाड, मोकाट , भटके, पिसाळलेले श्वानांचा बंदोबस्त करणे, निर्वीजीकरण, लसीकरण, पालन पोषन करणे व तत्सम सेवा पुरवणे (श्वान निर्बीजीकरण प्रकल्प राबवणे ) या कामी संस्था नियुक्त करण्यास ई- निविदा क्र.२०२१-ANMC- ६६३४८३-१ या ई-निविदेच्या मंजुरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका कोंडवाडा विभाग

संदर्भ- कोंडवाडा विभाग ई- निविदा क्र.२०२१-ANMC- ६६३४८३-१

दिनांक ७/४/२०२१ रोजी दुपारी १.०० वा. मा.उपायुक्त (कर) तथा अध्यक्ष निविदा तांत्रिक छाननी समिती व मा.मुख्य लेखाधिकारी तथा सचिव, मा. मुख्य लेखापरिक्षक तथा सचिव, वैद्यकीय अधिक्षक सदस्य सचिव, कोंडवाडा विभाग प्रमुख व पार्थ प्रतिष्ठान कल्याण व पिपलफॉर ॲनिमल, पुणे या संस्थेचे निविदाधारक यांचे समक्ष कागदपत्रांच्या तांत्रिक लिफाफे उघडल्या आलेले आहे. हजर असल्याबाबत त्यांच्या स्वाक्षरी घेण्यात आलेला आहे.

तद्नंतर दि.८/४/२०२१ रोजी मा.उपायुक्त (कर) तथा अध्यक्ष निविदा तांत्रिक छाननी समिती यांनी दोन्ही संस्थेचे आर्थिक लिफाफे उघडणेबाबत लेखी मान्यता दिलेली आहे.

सदर आदेशानुसार आज दि.८/४/२०२१ रोजी ई - निविदा कक्षामध्ये दोन्ही ही आर्थिक लिफाफे उघडण्यात आलेले आहे. त्या आर्थिक लिफाफामध्ये १] पार्थ प्रतिष्ठान कल्याण यांनी प्रति श्वानास रू.१२५०/- ,२] पिपलफॉर ॲनिमल,पुणे यांनी प्रतिश्वानास रू.९५०/- इतका दर आर्थिक लिफाफा मध्ये नमुद केलेला आहे. त्यांची सी-१ प्रत सोबत जोडलेली आहे.

सदर कामासाठी सन २०२०-२०२१ व २०२१-२०२२ या दोन वर्षासाठी अंदाजित रू. १ कोटी ४४ लक्ष इतका खर्च अपेक्षीत आहे.

तरी पिपल फॉर ॲनिमल,पुणे या संस्थेने ई - निविदेमध्ये प्रतिश्वानास रू.९५०/- (रूपये नउशे पन्नास फक्त) इतका कमी दर दिलेला असल्याने सदर संस्थेस काम देणे बाबत या प्रस्ताव मंजुरीस्तव व करारानामा करून कार्यादेश देणे बाबत आदेशार्थ सविनय सादर./अ

येणेप्रमाणे कोंडवाडा विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.वैद्यकीय अधिक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत "अ" प्रमाणे मान्येतस्तव तथापी आदेशार्थ सादर.

यावर लेखापरिक्षक / मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (सुधारित) मधील प्रकरण ७ मधील कलम ७३(क) प्रमाणे विभागाने कार्यवाही करणे संयुक्तीक राहील. निविदा तांत्रिक छाननी समितीने शिफारस केल्याप्रमाणे प्रस्तावीत "अ" नुसार कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, "अ" प्रमाणे मान्यतेसाठी

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

चर्चा :-

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील उनाड, मोकाट , भटके, पिसाळलेले श्वानांचा बंदोबस्त करणे, निर्वीजीकरण, लसीकरण, पालन पोषन करणे व तत्सम सेवा पुरवणे

(श्वान निर्बीजीकरण प्रकल्प राबवणे ) या कामी संस्था नियुक्त करण्यास ई- निविदा क्र.२०२१-ANMC- ६६३४८३-१ या ई-निविदेच्या मंजुरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

डॉ.सागर बोरूडे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- निर्बीजीकरण करणे करीता या एजन्सीचे दर आहेत.कुत्रे पकडण्या करीता स्वतंत्र्य एजन्सी कुत्रे पकडून त्यांना देणार.त्याऐवजी दोन्ही कामे एकाच एजन्सीला दिल्यास बरे होईल.याला एक एजन्सी,त्याला एक एजन्सी

मा.उपायुक्त (कर) श्री.डांगे :- प्रती कुत्र्या करीता रू.९५० /- दर आहे.एजन्सीने कुत्रे पकडायचे त्यांचे निर्बीजीकरण करायचे,त्याला काही दिवस ठेवायचे आणि परत सोडून दयायचे.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- सध्या कुत्रे पकडण्या करीता एक टेंडर आहे आणि हे स्वतंत्र आहे.माहिती घेवून सांगा.कारण कुत्रे पकडण्याकरीता स्वतंत्र्य एजन्सी आहे.

वैद्यकीय अधिक्षक, कोंडवाडा विभाग डॉ.राजुरकर :- सध्या कुत्रे पकडण्या चे काम बंद आहे.र्निबीजीकरण बंद आहे.मध्यंतरी तात्पुरत्या तक्रारी होत्या.तात्पुरती व्यवस्था म्हणून सॅनेटररी इन्सपेक्टर श्री.रामदिन साहेब यांनी तात्पुरते माणसे पाठविले होते.ही जी एजन्सी आहे ही कुत्रे पकडणार.त्यांचे निर्बीजीकरण करणार,लसीकरण करणार आणि परत त्या एरीया मध्ये सोडणार.असे हे दोन वर्षा करीताचे काम आहे.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- ज्या कुत्र्यांचे र्निबीजीकरण करणार यांच्या कानाल टॅग लावणार किंवा आपल्याला कसे कळणार कुत्र्याचे र्निबीजीकरण झाले आहे.

वैद्यकीय अधिक्षक, कोंडवाडा विभाग डॉ.राजुरकर :- कुत्र्यांच्या कानाला व्ही मार्क करता.कान कट करतात.इलेट्रीक मशिन असते.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- ती जखम पुन्हा जुळुन आल्यानंतर प्रॉब्लेम नको यायला.

वैद्यकीय अधिक्षक, कोंडवाडा विभाग डॉ.राजुरकर :- मोठा व्ही असतो, आपण समक्ष पहाणी करू शकता.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- पितळे होस्टेल व गर्व्हमेंट पॉलटक्नीक.कॉलेज या दोन ठिकाणी आपण ऑक्सीजनचे नियोजन करतो आहे हे दोन्ही एकत्रीत केले तर बरे होईल.दोन ठिकाणी डॉक्टर नियुक्त करावे लागातात.टेक्नीकल स्टाफ मिळत नाही.व्हेंटीलेर मशिनचे काम पहाण्या साठी डॉक्टर उपलब्ध होत नाही.जर एकाच छाता खाली आपण दोन ऐवजी एका ठिकाणी करा.

मा.उपायुक्त (कर) श्री.डांगे :- एकाच ठिकाणी करण्याचे नियोजन होते,परंतु इमारत उपलब्ध होत नाही.

मा.सभापती साहेब :- मी आत्ताच बुथ हॉस्पीटल येथे गेलो होते,त्या कार्यक्रमास मा.आमदार साहेब,मा.महापौर साहेब उपस्थीत होते.बुथ हॉस्पीटल मागे लेडीज होस्टेलची इमारत आहे.ती मनपाने दुरूस्त करून दिली तर ते चालविण्या दयायला तयार आहे.बुथ हॉस्पीटलचे काम चांगले आहे.मा.महापौरांनी अंदाजपत्रक तयार करण्याची सुचना केली आहे.मनपा व बुथ हॉस्पीटल यांनी संयुक्त रीत्या हॉस्पीटल सुरू केले तर काय हरकत आहे.आपण जागा पहाणी करीता जावू.त्यांचेकडे टेक्नीकल स्टफ उपलब्ध आहे.मी हमाल पंचायत हॉस्पीटलचे काम पहातो,माझा अनुभव आहे.या करोना काळात डॉक्टर ,नर्सेस डबल पगार देवून सुध्दा उपलब्ध होत नाही.त्यांनी प्रस्ताव दिला आहे.आपण सकारात्मक विचार करू.

मा.सौ. वंदना ताठे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील उनाड, मोकाट , भटके, पिसाळलेले श्वानांचा बंदोबस्त करणे, निर्वीजीकरण, लसीकरण, पालन पोषन करणे व तत्सम सेवा पुरवणे (श्वान निर्बीजीकरण प्रकल्प राबवणे ) करीता ई- निविदा क्र.२०२१-ANMC- ६६३४८३-१ निविदेतील लघुत्तम निविदाकार पिपल फॉर ॲनिमल,पुणे या संस्थेस सन २०२० -२०२१ व २०२१ -२०२२ या दोन वर्षा करीता काम देणे बाबत च्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील उनाड, मोकाट , भटके, पिसाळलेले श्वानांचा बंदोबस्त करणे, निर्वीजीकरण, लसीकरण, पालन पोषन करणे व तत्सम सेवा पुरवणे (श्वान निर्बीजीकरण प्रकल्प राबवणे ) करीता ई- निविदा क्र.२०२१-ANMC- ६६३४८३-१ निविदेतील लघुत्तम निविदाकार पिपल फॉर ॲनिमल,पुणे या संस्थेस सन २०२१ -२०२२ व २०२२ -२०२३ या दोन वर्षा करीता काम देणे बाबत च्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ.वंदना ताठे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०२**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

विषय क्रमांक- ३६ गुरूवार दि. ०३/०६/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** महानगरपालिका हद्दीतील पावसाळयापुर्वी मोठे नाले सफाइ ,दैनंदिन गटर सफाई व रस्ते सफोई करीता बाह्य यंत्रणेमार्फत कर्मचारी (कामगार) उपलब्ध करून घेणेकामी दय दराची जाहिर ई - निविदा क्र.०२(ID६७६६३५)प्राप्त निविदेतील प्राप्त दरास प्रशासनाने केलेल्या मंजुर दरास व येणा-या खर्चास मंजूरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका घन कचरा व्यवस्थापन

संदर्भ- मा. तांत्रिक छाननी समिती दि.१९/५/२०२१ रोजीच्या वाटाघाटी शिफारशी नुसार

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये प्रस्ताव देण्यात येतो की, महानगरपालिका हद्दीतील पावसाळयापुर्वी मोठे नाले सफाई, दैनंदिन गटर सफाई व स्वच्छ सर्वेक्षण कामी रस्ते सफाई करीता बाहय यंत्रणेमार्फत कर्मचारी (कामगार) उपलब्ध करून घेणेकामी देय दराची जाहिर ई- निविदा क्र.०२(ID६७६६३५) ऑन लाईन दिनांक १६/४/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

त्यानुसार सदरील प्राप्त निविदेतील तांत्रिक लिफाफा व आर्थिक दराचा लिफाफा उघडण्यात येवुन लघुत्तम निविदाधारक सहकार्य सप्लायर्स ॲण्ड अर्थ मुव्हर्स, अहमदनगर यांच्या सोबत दिनांक १९/५/२०२१ रोजी मा.छाननी समिमी समोर वाटाघाटी होवुन निविदाकार यांनी खालील प्रमाणे दरास मान्य करून तसे लेखी पत्र सादर केलेले आहे.

| अ.नं. | ई -निविदेत दाखल दर | वाटाघाटीत मान्य केलेले दर |
|---|---|---|
| १ | प्रति दिन प्रति कामगार / मजुर दर रक्कम रू.७८०/- | प्रतिदिन प्रति कामगार/मजुर दर रक्कम रू.६९५/- |

वरील प्रमाणे अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील पावसाळया पुर्वी मोठे नाले सफाई , दैनंदिन गटर सफाई व स्वच्छ सर्वेक्षण कामी रस्ते सफाई करीता बाहय यंत्रणेमार्फत कर्मचारी (कामगार) उपलब्ध करून घेणेकामी तुलनात्मक दृष्टया लघुत्तन निविदाकार सहकार्य सप्लायर्स ॲण्ड मुव्हर्स, अहमदनगर या निविदाकार यांच्या सोबत मा.छाननी समितीने वाटाघाटी करून सदरील दरास शिफारस केलेली आहे.

सबब वरील प्रमाणे दरास मंजुरीस्तव व मा.स्थायी समितीची मान्यता घेणेकामी सादर करणेकामी मान्यतेस्तव सविनय सादर./अ

येणेप्रमाणे प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक यांचा अहवाल असे.

यावर मा.घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर लेखापरिक्षक / मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मा.तांत्रिक छाननी समितीने केलेल्या दराबाबत शिफारशीनुसार प्रस्तावीत "अ" प्रमाणे कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.सहाय्यक आयुक्त (कर) यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत "अ" प्रमाणे मा.स्थायी समितीची मान्यता घेणेकामी मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, Proposed Befor Standing Committee for sanction

यावर मा.आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, Minimum Wayes Act प्रमाणे किती दर देय आहे. ?

--०००--

फेरसादर,

उपरोक्त विषयानुसार मा.आयुक्त यांच्या दिनांक २१/५/२०२१ रोजीच्या सुचनेनुसार खालील प्रमाणे मा. तांत्रिक छाननी समितीने दराबाबत केलेल्या शिफारस कामी मा.उपसचिव महाराष्ट्र शासन , उदयोग ,उर्जा व

कामगार विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई यांचें दिनांक २४ जुलै २०१९ रोजीच्या अधिसुचनानुसार कडील किमान वेतन नुसार देय दर आहेत.

| अ.क्र. | कामगारांची वर्गवारी | मुळ किमान वेतन मधील परिमंडळ १ नुसार | स्थानिक स्वराज्य संस्था करीता भत्ता रक्कम | एकुण |
|---|---|---|---|---|
| १ | अकुशल कामगार | १०,०२१/- | ५,२५०/- | १५,२७१/- |

वरीलप्रमाणे किमान वेतननुसार देय रक्कम रू.१५,२७१/- असुन त्यामध्ये भविष्य निर्वाह निधी २५% रक्कम रू.३,८१८/- असे एकुण रू. १९,०८९/- प्रति महिना देय रक्कम होते त्यामुळे अधिसुचने मधील मार्गदर्शक सुचनेनुसार कामाचे २६ दिवस धरता दैनंदिन प्रति कामगार दिन दर रू.७३४/- देय दर आहेत.

त्यानुसार दिनांक १९/५/२०२१ रोजी मा.छाननी समिती बैठकीत ठेकेदार सोबत किमान वेतन दराबाबत चर्चा होवुन मा. तांत्रिक छाननी समितीने प्रतिदिन प्रति कामगार / मजुर दर रक्कम रू.६९५/- या दरास शिफारस केलेली आहे.

सबब वरील प्रमाणे दरास मंजुरीस्तव व मा.स्थायी समितीची मान्यता घेणेकामी सादर करणेकामी मान्यतेस्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक यांचा फेरसादर असे.

यावर मा.घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, M.W.A.ct.नुसार रू.७३४/- दर असुन निविदेअंती रू.६९५/- दर प्राप्त आहेत व ते कमी आहेत.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**ऑललाईन V.C. चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- विषयाचे वाचन करा.

त्यानुसार सभेमध्ये विषयाचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.शाम नळकांडे :- पावसाळया पुर्वी हा प्रस्ताव सभेपुढे यायला पाहिजे होता.आठ दहा दिवसांपुर्वीच पावसाळा सुरू झाला.प्रस्ताव यायला उशिर का झाला?कधी वर्क ऑर्डर होणार ? ठेकेदाराला कधी वर्कऑर्डर मिळणार?कधी नालेसफाई होणार?हा प्रस्ताव दोन महिने आधी यायला पाहिजे होता.हा विलंब झाला याला जबाबदार कोण?

मा.सभापती साहेब :- आपले पोकलॅन मशिन व्दारे ओढे नाले सफाईचे काम चालू आहे.हे छोटे नाले सफाई करीता कामगार घेण्याचे काम आहे.हे काम अदयाप सुरू झालेले नाही.जर आणखी उशीर झाला असता तर पावसाळा संपूण गेला असता.हा खुप गंभीर विषय आहे.यामध्ये जर काही आपत्ती झाली.काही प्रॉब्लेम झाले तर प्रशासनाने याचे उत्तर दयावे.आत्ता सर्व शहरातल्या नाल्या साफ होवून हा विषय संपायला पाहिजे होता.तीन ते चार पाउस झाले.आमच्या कोठी भागामध्ये भागानगरे साहेबांच्या वॉर्ड मध्ये सुध्दा पाणी घुसले आहे.हे टेंडर उशीर काढायला जबाबदार कोण आहे?

मा.श्री.शाम नळकांडे :- टेंडर काढण्यास उशीर का झाला याचा खुलासा दयावा.

मा.उपयुक्त (कर) श्री.डांगे :- सध्या कोरोनाच्या परिस्थीती मुळे सर्व जन त्या कामामध्ये बीझी होते.

मा.श्री.नळकांडे साहेब :- कोरोणाची परिस्थीती आत्ता झाली.कोरोणा आख्या भारतामाध्ये आहे.बाकीचे सर्व प्रस्ताव तयार होतात.मग हा प्रस्ताव का होत नाही.याला विलंब का झाला ? कारण सांगु नका.नालेसफाईचा दोन महिने प्रस्ताव आला पाहिजे होता.

मा.सभापती साहेब :- पावसाळया पुर्वीच नाले साफ झाले पाहिजे होते.

मा.उपयुक्त (कर) श्री.डांगे :- आपण प्रत्येक प्रभाग समिती करीता वीस कार्मचारी देणार आहे.पाउस पडल्यानंतर ज्या ठिकाणी प्रॅब्लेम उदभवतील तो सॉल करण्याचा प्रयत्न करणार आहोत.जुन जुलैमध्ये २० टक्के पाउस होतो.

मा.श्री.शाम नळकांडे :- यापुर्वी जुन महिन्याच्या पुर्वीच नालेसफाई झालेली आहे.मागच्या वर्षी सुध्दा कोरोना होता त्यावेळी सुध्दा ५० टक्के नाले सफाई झालेली होती.माझी प्रशासनाला विनंती आहे कि,पुढच्या वर्षी अशी दिरंगाई झाली नाही पाहिजे.पावसाळयापुर्वीच नालेसफाई झाली पाहिजे.हा सुध्दा आरोग्याचा मोठा प्रश्न आहे.नालेसफाई सुध्दा झालीच पाहिजे.ड्रनेजचे पाणी नागरीकांच्या घरामध्ये जाण्याची शक्यता जास्त प्रमाणात असते.आपण प्रशानसनो याची योग्य ती दखल घ्यावी.याची वर्क ऑर्डर लवकरात लवकर देवून,ठेकेदाराकडून मुदती पुर्व काम करून घेणे गरजेचे राहिल.आपण सरासरी सांगीतली ,परंतु आज शहरामध्ये मोठया प्रमाणात पाउस पडत आहे.दोन - तीन पावसात शहराची दाणदिन उडालेली आहे.रस्त्यांची दयनीय आवस्था झालेली आहे.येथून पुढे दिरंगाई करू नका.अहमदनगर महानगरपालिका चार जेटींग मशिन घेणार होती त्या प्रस्तावाचे काय झाले.

मा.सभापती साहेब :- आमच्या प्रभागामध्ये र्दुघटना घडल्या,आम्ही इकडू तीकडून कर्मचारी गोळा करून प्रश्न मार्गी लावला.हा विषय मंजूर झालेला आहे.प्रशासनाने या ठेकेदारास बोलावून तात्काळ काम सुरू करणे बाबत आदेश दयावेत. चार जेटींग मशिन करीता प्रस्ताव तात्काळ सादर करा,या करीता निधी सुध्दा उपलब्ध आहे.

मा.उपयुक्त (कर) श्री.डांगे :- सदर काम तात्काळ सुरू करण्यात येईल.मा.महासभेने आरोग्य विभागाचा डी.पी.आर.मंजूर केलेला आहे.त्या डी.पी.आर. नुसार निधीची कामतरता असल्याने आपण घेवू शकलो नाही.

मा.सभापती साहेब :- मंजूर डि.पी.आर.रक्कम जी कमी पडेल ती शिल्लक १४व्या वित्त आयोगातून निधी उपलब्ध करून वाहने खरेदी करण्यात यावीत.

मा.श्री.मनोज कोतकर :- या विषया बाबत कोणाचे पत्र आले होते का ? मी या संदर्भात फेब्रुवारी मध्ये पत्र दिले होते.गेल्या तीन महिन्या पुर्वी तुम्हाला पत्र दिले मग हा विषय का झाला नाही ?

डॉ.शेडाळे :- माझी नेमणूक मार्च मध्ये झाली आहे.त्यावर प्रस्ताव केले होते.निविदा प्रसिध्द केली.

मा.श्री.मनोज कोतकर :- फाईली पेंडींग का ठेवल्या? हा अत्यावश्यक मधला विषय आहे.

डांगे :- या करीता उशीर झालेला आहे.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- सहकार्य सप्लायर्स ॲण्ड मुव्हर्स, अहमदनगर या निविदाकाराने यापुर्वी् हे काम केले आहे का?

डॉ.शेडाळे :- पेकलॅन मशीनने त्यांनी काम केले आहे.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- महानगरपालिकेस ५ स्टार नामंकन मिळणे करीता पोकलन EX२०० मशिन वापरून त्यांना आपण काम करण्याचे अटी व शर्ती मध्ये सांगीतले होते परंतु त्यानी EX७० मशिन व्दारे काम केले आहे.मा.उपमहापौर यांनी या बाबत पत्र सुध्दा दिले आहे.

घनकचरा व्यवस्थापक विभाग प्रमुख डॉ.शेडाळे :- ठकेदाराला उपलब्ध झाले नाही.त्यामुळे त्याने EX७० मशिन व्दारे काम केले.या तफावत मधील ठेकेदाराकडून रक्कम भरून घेतली आहे.

मा.श्री. रविंद्र बारस्कर :- त्यांना दुसरे काही काम दिले का?

घनकचरा व्यवस्थापक विभाग प्रमुख डॉ.शेडाळे :- Dead Animal Incinerator प्रकल्पाचे देखभाल व दुरूस्तीचे काम दिले होते.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- पदाधिका-यांनी दिलेल्या पत्रांची दखल घेवून कार्यवाही करा.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- ब-याच वेळा नालेसफाईचा गाळ काढून रस्त्याच्या कडेला टाकला जातो.तो उचलला जात नाही.पाउस आल्यानंतर तो गाळ पुन्हा नाल्यांमध्ये जातो या करीता काही उपाययोजना केली आहे का?त्यामुळे अपघात होतात.

उपायुक्त(कर) श्री.डांगे :- असे कोठे निदर्शणास आल्यास ट्रॅक्टर लावून गाळ उचलला जाईल

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- या विषयाचा ठराव तात्काळ करून वर्कऑर्डर देवून काम चालू करण्यात यावे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिका हद्दीतील पावसाळयापुर्वी मोठे नाले सफाई ,दैनंदिन गटर सफाई व रस्ते सफाई करीता बाह्य यंत्रणेमार्फत कर्मचारी (कामगार) उपलब्ध करून घेणेकामी दय दराची जाहिर ई - निविदेतील लघुत्तम निविदा धारक सहकार्य सप्लायर्स ॲण्ड अर्थ मुव्हर्स यांची सर्वात कमी दरावर झ ालेल्या वाटाघाटी नुसार छाननी समितीने केलेल्या शिफारस केलेल्या दरास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

**ठराव :-** महानगरपालिका हद्दीतील पावसाळयापुर्वी मोठे नाले सफाई ,दैनंदिन गटर सफाई व रस्ते सफोई करीता बाह्य यंत्रणेमार्फत कर्मचारी (कामगार) उपलब्ध करून घेणेकामी दय दराची जाहिर ई - निविदा क्र.०२(ID६७६६३५)प्राप्त निविदेतील लघुत्तम निविदा धारक सहकार्य सप्लायर्स ॲण्ड अर्थ मुव्हर्स यांची सर्वात कमी दरावर झालेल्या वाटाघाटी नुसार छाननी समितीने केलेल्या शिफारस केलेल्या दरास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.प्रकाश भागानगरे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०२**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

विषय क्रमांक- ३७ गुरूवार दि. ०३/०६/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील शासनाचे सुचनेनुसार मनपा हद्दीतील नागरिकांमध्ये जनजागृती कामी होर्डीग ,बॅनर व इतर कामांचे दर निश्चितीनुसार खाजगी एजन्सीची नियुक्ती करणेकामी जाहिर ई- निविदा सुचना क्र.०७ सन २०२०-२०२१ (T.ID ६३४३३७) प्राप्त निविदेतील प्राप्त दरास प्रशासनाने केलेल्या मंजुर दरास व येणारे खर्चास मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभाग

**संदर्भ-** १. मा.आयुक्त यांचे दिनांक ०१/०३/२०२१ रोजीचे दर मंजुरीनुसार

२. मा.छाननी समितीच्या दिनांक २५/०२/२० रोजीच्या वाटाघाटी दर शिफारशीनुसार

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये प्रस्ताव देण्यात येतो की, मा.आयुक्त यांच्या दि.२९/१२/२०२० रोजीच्या मंजुरी अन्वये अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील शासनाचे सुचनेनुसार मनपा हद्दीतील नागरिकांमध्ये जनजागृती कामी होर्डीग, बॅनर व इतर कामांचे दर निश्चितीनुसार खाजगी एजन्सीची नियुक्ती करणेकामी जाहिर ई-निविदा सुचना क्र.०७ सन २०२०-२०२१ (T.ID ६३४३३७) दि.०७/०१/२०२० रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. सदरी ई- निविदेत प्राप्त तुलनात्मक दृष्टया लघुत्तम दराच्या निविदाकार यांच्या सोबत दिनांक २५/०२/२०२१ रोजी मा. तांत्रिक छाननी समिती समोर वाटाघाटी करण्यात आली आहे. त्यानुसार सदर बैठकीत खालील प्रमाणे वाटाघाटी होवुन निविदाकार यांनी वाटाघाटी दरानुसार काम करण्यास तयारी दर्शवाली आहे आणि त्यानुसार पत्र सादर करणार केले आहे.

| ई- निविदेत दाखल दर | वाटाघाटीत मान्य केलेले दर |
|---|---|
| १] लोखंडी फ्रेम सहीत होडींग प्रति स्केअर फुट प्रति नग दर रक्कम रू.५६/- | १] लोखंडी फ्रेम सहीत होडींग प्रति स्केअर फुट प्रति नग दर रक्कम रू.५०/- |
| २] बॅनर प्रति स्केअर फुट प्रति नग रक्कम रू.३७/- | २] बॅनर प्रति स्केअर फुट प्रति नग रक्कम रू.३५/- |
| ३] भिंतीवर वॉलपेंट द्वारे सुविचार , घोषवाक्य लिहिणे प्रति प्रति स्केअर फुट दर रक्कम रू.४८/- | ३] भिंतीवर वॉलपेंट द्वारे सुविचार , घोषवाक्य लिहिणे प्रति प्रति स्केअर फुट दर रक्कम रू.४५/- |
| ४] वाहनांवर ऑईल पेंट द्वारे लिहिणे प्रति स्केअर फुअ दर रक्कम रू.९०/- | ४] वाहनांवर ऑईल पेंट द्वारे लिहिणे प्रति स्केअर फुअ दर रक्कम रू.९०/- |
| ५]प्रमाणपत्र छपाई करून पुरवठा करणे प्रति नग A-४ साईज मध्ये किमान दोन ते तीन कलर मधील प्रति नग दर रक्कम रू.५०/- | ५]प्रमाणपत्र छपाई करून पुरवठा करणे प्रति नग A-४ साईज मध्ये किमान दोन ते तीन कलर मधील प्रति नग दर रक्कम रू.५०/- |
| ६] स्टीकर्स प्रति इंच किमान दोन ते तीन कलर मधील प्रती इंच दर रक्कम रू.०.२५/- पैसे | ६] स्टीकर्स प्रति इंच किमान दोन ते तीन कलर मधील प्रती इंच दर रक्कम रू.०.२०/- पैसे |
| ७] आयकार्ड तयार करून पुरवठा करणे बाबत प्रती नग रक्कम रू.२००/- | ७] आयकार्ड तयार करून पुरवठा करणे बाबत प्रती नग रक्कम रू.२००/- |
| ८] सन्मान चिन्ह प्रति नग रक्कम रू.५००/- | ८] सन्मान चिन्ह प्रति नग रक्कम रू.४५०/- |
| ९] पोम्पलेट प्रति नग रक्कम रू.४.२०/- पैसे | ९] पोम्पलेट प्रति नग रक्कम रू.४/- |

वरीलप्रमाणे वाटाघाटीत मा. तांत्रिक छाननी समिती केलेल्या दरास शिफारशीनुसार मा.आयुक्त यांनी दिनांक ०१/०३/२०२१ रोजी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार मा.शासनाकडील सुचनेनुसार वेळोवेळी कामे करून घेणे आवश्यक असल्याने विभागामार्फत २५ लक्ष पर्यत अंदाजित खर्च धरण्यात आलेले होते. मात्र पुढील कामाचे नियोजन पाहात अद्याप मनपाने स्वच्छ सर्वेक्षण २०२१ कामी केलेली कार्यवाही बाबत स्वच्छ सर्वेक्षण २०२१ ची

पाहाणी करणारी टिम, GFC ५ स्टार रेटींग तपासणी टिम व ओडीएफ प्लस प्लस ची तपासणी करणारी टिम अद्याप आलेली नाही सदर टिम कधी ही येवु शकते त्यानुसार सदरील मंजुर दरानुसार २५ लक्ष पर्यतचे कामे मा.आयुक्त यांच्या मान्यतेने करण्यात आलेले आहे. मात्र मा.शासनामार्फत वेळोवेळी जनजागृतीची कामाच्या सुचना प्राप्त होतात तसेच पुढील वर्षी मा.शासनाने स्वच्छ सर्वेक्षण २०२० ची कार्यवाही सुरू करण्यास आदेश दिले तर सदर दरानुसार कामे करता येतील त्याकरिता वरीलप्रमाणे दर मंजुरीनुसार कामे करून घ्यावे लागणार आहे. सबब कामांचे दर मान्यतेकामी मा.स्थायी समितीची मान्यता असणे आवश्यक आहे./अ

सबब वरीलप्रमाणे दरास मा.स्थायी समितीची मान्यता घेणेकामी मान्यतेस्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे प्र.मुख्य स्वच्छता निरीक्षक तथा स्वच्छ सर्व्हेक्षण कक्ष प्रमुख यांचा अहवाल असे

यावर मा.सहाय्यक आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत "अ" प्रमाणे मा.स्थायी समितीची मान्यता घेणेकामी मान्यततेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांची अभिप्राय की, "अ" प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑललाईन V.C. चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- विषय क्र.३७ चे वाचन करा

त्यानुसार सभेमध्ये विषयाचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभपती साहेब :- घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील शासनाचे सुचनेनुसार मनपा हद्दीतील नागरिकांमध्ये जनजागृती कामी होर्डीग ,बॅनर,रंगकाम व इतर कामांचे दर निश्चितीनुसार खाजगी एजन्सीची नियुक्ती करणेकामी निविदेतील लघुत्तम निविदा धारक सहकार्य सप्लायर्स ॲण्ड अर्थ मुव्हर्स यांची सर्वात कमी दरावरझालेल्या वाटाघाटी नुसार छाननी समितीने केलेल्या शिफारस केलेल्या दरास मान्यता देण्यात येत आहे.पुढील सन २०२२-२३ या आर्थिक वर्षा करीता याच दराने याच जनजागृती कामी होर्डीग ,बॅनर,रंग काम व इतर काम करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील शासनाचे सुचनेनुसार मनपा हद्दीतील नागरिकांमध्ये जनजागृती कामी होर्डीग ,बॅनर,रंगकाम व इतर कामांचे दर निश्चितीनुसार खाजगी एजन्सीची नियुक्ती करणेकामी निविदेतील लघुत्तम निविदा धारक सहकार्य सप्लायर्स ॲण्ड अर्थ मुव्हर्स यांची सर्वात कमी दरावर झालेल्या वाटाघाटी नुसार छाननी समितीने केलेल्या शिफारस केलेल्या दरास मान्यता देण्यात येत आहे.पुढील सन २०२२-२३ या आर्थिक वर्षा करीता याच दराने याच जनजागृती कामी होर्डीग ,बॅनर,रंग काम व इतर काम करण्यास ही सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.प्रकाश भागानगरे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०२**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

विषय क्रमांक- ३८ गुरूवार दि. ०३/०६/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका अग्निशमन विभागासाठी जिल्हा नियोजन विकास समितीमार्फत महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियाना अंतर्गत प्राप्त अनुदानातून साहित्य खरेदीबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका स्टोअर विभाग

**संदर्भ :-** १)अग्निशमन विभाग जा.क्र.-९० दि.२४/०६/२०२०
२)अग्निशमन विभाग जा.क्र.-५७९ दि.१७/०२/२०२१

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरुन विनंती रिपोर्ट की,मा.संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय यांचे पत्र क्र.मअसे/३७-ए/ २०२०/१९४ दि.१० फेब्रुवारी २०२० अन्वये अ.नं.१ ते ११ प्रकारची अग्निशमन उपकरणे खरेदी मनपा स्तरावर योग्य ती विहीत शासकिय निविदा प्रक्रिया अवलंबून करण्यास तांत्रिक मान्यता दिलेली आहे.

मा.जिल्हाधिकारीसाहेब अहमदनगर यांनी पत्र क्र.नपा/कार्या-२/२६७/जा.क्र.४८०/२०२० दि.२४/०३/२०२० चे आदेशान्वये खालील प्रमाणे अ.क्र.१ ते ११ ची अग्निशमन उपकरणे खरेदीस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.६१,२०,०००=००फक्तच्या खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे.

| अ.क्र. | अग्निशमन साहित्याचा संक्षिप्त तपशील | मुळ नस्तीमध्ये साहित्याचा सविस्तर तपशील नमुद असलेले पा.नं. | परिमाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| 1) | Fire Proximity Suit (RYROTEX – 1879028) | 43 to 46 | 40 Nos |
| 2) | Self Contained B.A.Set IS 10245 (Part - 2)<br>(Carbon Composite Cylinder - Venus Make) | 48 | 6 Nos. |
| 3) | Hand Operated Combination Tools (SPS 260 H) | 67 to 68 | 1 Nos. |
| 4) | Hydraulic Spreader (SP 35) | 49,68 to 69 | 1 Nos |
| 5) | Hydraulic Combitools (SPS 360) | 69 | 1 Nos. |
| 6) | Hydraulic Cutter (s 200-49) | 54,70 | 1 Nos. |
| 7) | Hydraulic Talescopic Ram (TZT 2 - 1500) | 71 | 1 Nos. |
| 8) | Power Pack With 2 Nos 5 Meter Hose (V 50 Eco) | 71 to 72 | 1 Nos. |
| 9) | High Pressure Pneumatic Lifting Bags | 72 to 74 | |
| | **a)**Upto 40 Tones (W 41) | | 1 Nos. |
| | **b)**Upto 49 Tones (W 52) | | 1 Nos. |
| | **c)**Upto 65 Tones (W 66) | | 1 Nos. |
| | **d)**Accessory Pressure Reducer | | 1 Nos. |
| | **e)**Dual deadman Controller | | 1 Nos. |
| | **f)**Shut Off Valve | | 1 Nos. |
| | **g)**5 Meter Hose - 2 Nos | | 1 Nos. |
| 10) | KV-Lite AFFF 3% - C 6 Aqueous Film Forming Foam | 59 | 2000 Ltrs. |
| 11) | Life jacket Full MMD Approvals | 62 | 40 Nos. |

त्यानुसार स्टोअर विभाग दि.२२/१०/२०२० रोजीचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर केला असता मा.आयुक्तसाहेब यांनी GeM/E Tender करणेस दि.०३/११/२०२० रोजी मान्यता दिलेली आहे.परंतू अ.क्र.१ ते ११ प्रकारचे अग्निशमन साहित्य / उपकरणे खरेदीकामी GeM पोर्टल / ई-निविदा प्रक्रीया राबविणेकामी प्राप्त मुळ नस्तीचे अवलोकन करता अग्निशमन साहित्याचे संपूर्ण तपशील नमुद केलेला नसल्यामुळे खरेदी प्रक्रिया करण्यासाठी यासंदर्भात अग्निशमन विभागाकडून सविस्तर वर्णनाची मागणी करुन प्रस्तावित अ.नं.१ ते ११ चे अग्निशमन साहित्यापैकी कोणते साहित्य GeM पोर्टलवर उपलब्ध आहे त्याची GeM पोर्टलवरुन खरेदी प्रक्रीयाकामी माहिती तसेच GeM पोर्टलवर उपलब्ध नसलेल्या साहित्याची ई-निविदा प्रक्रियादवारे खरेदीकामी माहिती देण्यात यावी.त्याप्रमाणे प्रस्तावित साहित्य खरेदीकामी खरेदी प्रक्रिया राबविण्यात येईल.असे जा.क्र.स्टोअर विभाग-३२१ दिनांक.२९/०१/२०२१ अन्वये मा.मुख्य अग्निशमन अधिकारी यांना कळविण्यात आलेले होते.सदर पत्राचे अनुषंगाने त्यांनी संदर्भिय पत्र क्र.२ अन्वये अ.क्र.१,२ व १० चे साहित्य GeM पोर्टलवर उपलब्ध असल्याने सदरचे साहित्य GeM पोर्टलवरुन व अ.क्र.३ ते ९ व ११ चे साहित्य ई-निविदा मागवून खरेदी करणेबाबत कळविलेले आहे.

त्यानुषंगांने अ.क्र.३ ते ९ व ११ चे साहित्य खरेदी करिता मा.महाराष्ट्र शासन उदयोग,ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक:भांखस-२०१४/ प्र.क्र.८२/ भाग-III/उदयोग-४ मादाम कामारोड, हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय,मुंबई - ४०००३२ दिनांक.१ डिसेंबर २०१६ अन्वये शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपद्धतीची सुधारित नियमपुस्तिकेतील परिच्छेद क्र.४.१ अन्वये ई-निविदा कार्य प्रणालीचा अवलंब करुन दै.पुढारी दि.२०/०३/२०२१ चे वर्तमानपत्रात संक्षिप्त जाहिरात तसेच **http://mahatenders. gov.in** या वेबसाईटवर जाहिर टेंडर नोटीस प्रसिध्द करुन ई-निविदा मागविल्या असता मुदतीत -
१)व्ही.पी.फायर सर्व्हिसेस,सोलापूर
२)सोलारॉय इंजिनिअर्स प्रा.लि.,मुंबई
३)शरद ट्रेडर्स,उस्मानाबाद
४)जोसफ लेसली डायनामिक्स मॅन्युफॅक्चरिंग प्रा.लि.,पालघर
५)राधास्वामी इंडस्ट्रीज,उस्मनाबाद
याप्रमाणे एकूण ५ (पाच) निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

उपरोक्त सर्व निविदा ग्राहय असल्याने सर्व निविदांचे व्यापारी लिफाफे उघडण्यात आलेले असून निविदादरांचा तुलनात्मक तक्ता पाहता - अ.क्र.१ ते ८ चे साहित्याचे दर सोलारॉय इंजिनिअर्स प्रा.लि.,मुंबई यांचे स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम प्राप्त झालेले आहेत.

स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम निविदा दर धारक निविदाकार सोलारॉय इंजिनिअर्स प्रा.लि.,मुंबई यांना दर निगोसिएशन करिता बोलावून दि.०४/०५/२०२१ रोजी झालेल्या मा.प्रशासकिय खरेदी समितीच्या बैठकीत सदरच्या निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यासह संपुर्ण प्रकरण अवलोकनार्थ तथा निर्णयास्तव ठेवण्यात आले असता दर निगोसिएशनसाठी समक्ष उपस्थित न राहता त्यांनी पत्राद्वारे निविदेमध्ये दिलेल्या दरामध्ये अर्धा टक्का दर कमी केलेला असून त्यांनी दर निगोसिएशन नंतर दिलेला अंतिम दर खालील तक्त्यात कॉलम क्र.५ मध्ये नमुद केलेले आहेत.निविदाकार यांनी बैठकीत झालेल्या निर्णयाप्रमाणे लेखी संमतीपत्र दिलेले आहे.मुदतीत प्राप्त निविदातील स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम दर बाजारभावाशी पडताळून दर निगोसिएशनमध्ये कमी करुन दिलेले अंतिम दर योग्य असल्याने पुरवठादार यांनी दर निगोसिएशन नंतर दिलेल्या खालील तक्त्यात कॉलम क्र.५ मध्ये नमुद दरास व सदर दराने खालील तक्त्यात कॉलम क्र.२ मध्ये नमुद अ.क्र.१ ते ८ चे साहित्य त्यांचेकडून खरेदी करणेस व साहित्य खरेदीकामी येणा-या रक्कम रुपये.२९,६६,९५८=०० फक्त(अक्षरी रक्कम रुपये.एकोणतीस लक्ष सहासष्ठ हजार नऊशे अठ्ठावंन्न फक्तच्या)खर्चास,नामंजुर निविदाकार यांची निविदा बयाणा (EMD)रक्कम त्यांना परत करणेस मंजुरी मिळणेबाबत तसेच 1)Fire Proximity Suit -40 Nos. 2)Self Contained B.A.Set IS 10245 (Part-2)(Carbon Composite Cylinder - 6 Nos व 3)AFFF 3% C6 Aqueous Film Forming Foam 2000 Ltrs. इ.खरेदीबाबतची GeM पोर्टलवरील कार्यवाही पुर्ण करुन प्राप्त लघुत्तम दरासह अग्निशमन विभागा करिता जिल्हा नियोजन विकास समितीमार्फत महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियाना अंतर्गत प्राप्त अनुदानातून साहित्य खरेदीबाबतच्या प्रस्तावासह संपूर्ण प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे निर्णयास्तव सादर करणेबाबत शिफारस मा.प्रशासकिय खरेदी समितीमार्फत करण्यात आलेली आहे

प्राप्त ई-निविदातील लघुत्तम दर धारक निविदाकार यांचे नाव - सोलारॉय इंजिनिअर्स प्रा.लि.मुंबई

| अ क्र | साहित्याचा तपशिल | परिमाण | ई-निविदामध्ये स्पर्धात्मकदृष्टया प्राप्त लघुत्तम दर | दर वाटाघाटी नंतर कमी करुन दिलेला अंतिम दर | खरेदीकामी येणारा एकूण खर्च रक्कम रुपये. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| 1) | Hand Operated Combination Tools (SPS 270 H) | 1 Nos | ३४२२००=०० / प्रती १ नग | ३४०४८९=०० / प्रती १ नग | ३४०४८९=०० |
| 2) | Hydraulic Spreader (SP 35) | 1 Nos. | ४५१९४०=०० / प्रती १ नग | ४४९६८०=०० / प्रती १ नग | ४४९६८०=०० |
| 3) | Hydraulic Combitools (SPS360L) | 1 Nos. | ३५४०००=०० / प्रती १ नग | ३५२२३०=०० / प्रती १ नग | ३५२२३०=०० |
| 4) | Hydraulic Cutter (RSX 165-65) | 1 Nos. | ३४२२००=०० / प्रती १ नग | ३४०४८९=०० / प्रती १ नग | ३४०४८९=०० |
| 5) | Hydraulic Talescopic Ram (RZT 2 - 1500) | 1 Nos. | ३५४०००=०० / प्रती १ नग | ३५२२३०=०० / प्रती १ नग | ३५२२३०=०० |
| 6) | Power Pack With 2 Nos 5 Meter Hose (V 50 Eco) | 1 Nos. | ४८९७००=०० / प्रती १ नग | ४८७२५१=०० / प्रती १ नग | ४८७२५१=०० |
| 7) | High Pressure Pneumatic Lifting Bags | | | | |
| | **a)**Upto 40 Tones (W 41) | 1 Nos. | ११८०००=०० / प्रती १ नग | ११७४१०=०० / प्रती १ नग | ११७४१०=०० |
| | **b)**Upto 49 Tones (W 52) | 1 Nos. | १४१६००=०० / प्रती १ नग | १४०८९२=०० / प्रती १ नग | १४०८९२=०० |
| | **c)**Upto 65 Tones (W 66) | 1 Nos. | २०१०४०=०० / प्रती १ नग | २०००३५=०० / प्रती १ नग | २०००३५=०० |
| | **d)**Accessory Pressure Reducer | 1 Nos. | १४१६०=०० / प्रती १ नग | १४०८९=०० / प्रती १ नग | १४०८९=०० |
| | **e)**Dual deadman Controller | 1 Nos. | ४७२००=०० / प्रती १ नग | ४६९६४=०० / प्रती १ नग | ४६९६४=०० |
| | **f)**Shut Off Valve | 1 Nos. | १०६२०=०० / प्रती १ नग | १०५६७=०० / प्रती १ नग | १०५६७=०० |
| | **g)**5 Meter Hose - 2 Nos | 1 Set | ७६७०=०० / प्रती १ सेट | ७६३२=०० / प्रती १ सेट | ७६३२=०० |
| 8) | Life jacket Full MMD Approvals ULJ15 | 40 Nos. | २६८८=०० / प्रती १ नग | २३७५=०० / प्रती १ नग | १०७०००=०० |
| | | | | **एकूण रक्कम रुपये.** | **२९६६९५८.००** |

तसेच अ.क्र.१ - Fire Proximity suit - 40 Nos खरेदी करीता GeM पोर्टलवर Bid Number-GEM/2021/B/1198248 Dated-30/04/2021 अन्वये प्रसिध्द केले असता मुदतीत एकूण चार दरपत्रके प्राप्त झालेली असून Fire Proximity suit - 40 Nos करिता खालील तक्त्यात कॉलम क्र.५ मध्ये नमुद केल्याप्रमाणे एकूण लघुत्तम किंमत प्राप्त झालेली आहे.

लघुत्तम किंमतधारक पुरवठादाराचे नाव - सिस्टीम ५ एस प्रायव्हेट लिमिटेड

| अ.क्र. | साहित्याचा तपशील | परिमाण | Bid Number / दिनांक | GeM पोर्टलवरील प्राप्त लघुत्तम एकूण किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| 1) | Fire Proximity Suit | 40 Nos. | GEM/2021/B/1198248 Date.30/04/2021 | 14,22,400=00 |
| | | | **Total Rs.** | **14,22,400=00** |

सिस्टीम ५ एस प्रायव्हेट लिमिटेड यांनी दि.१४/०५/२०२१ रोजीचे ई-मेल द्वारे साहित्य पुरवठा कालावधीस पुरवठा आदेशानंतर १५ दिवसाचा असून सध्या कोव्हीड-१९ मुळे तामीळनाडूमध्ये लॉकडाऊन असल्यामुळे १५ दिवसात पुरवठा होणे शक्य नसल्यामुळे पुरवठयासाठी पुरवठा आदेशानंतर ६० दिवस मुदतवाढ मिळावी अशी मागणी केलेली आहे

अ.क्र.२ - Fire Breathing Apparatus - 6 Nos खरेदी करीता GeM पोर्टलवर Bid Number-GEM/2021/B/1198321 Dated-30/04/2021 अन्वये प्रसिध्द केले असता मुदतीत एकूण सहा दरपत्रके प्राप्त झालेली असून त्यातील दोन निविदा दरपत्रकातील कागदपत्रांची पुर्तता न झाल्याने ते अग्राहय करण्यात येवून उर्वरीत चार ग्राहय दरपत्रकांचा दराचे लिफाफे उघडण्यात आलेले असून Fire Breathing Apparatus (SCBA-EB137) - 6 Nos करिता खालील तक्त्यात कॉलम क्र.५ मध्ये नमुद केल्याप्रमाणे एकूण लघुत्तम किंमत प्राप्त झालेली आहे.

<u>लघुत्तम किंमतधारक पुरवठादाराचे नाव - सुअरसेफ्टी (इंडीया) लिमिटेड</u>

| अ.क्र. | साहित्याचा तपशील | परिमाण | Bid Number / दिनांक | GeM पोर्टलवरील प्राप्त लघुत्तम एकूण किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| 1) | Fire Breathing Apparatus | 6 Nos. | GEM/2021/B/1198321 Date.30/04/2021 | 3,60,000=00 |
| | | | **Total Rs.** | **3,60,000=00** |

अ.क्र.१० -AFFF 3%- C6Aqueous Film Forming Foam- 2000 Ltrs.खरेदी करीता GeM पोर्टलवर- Bid Number-GEM/2021/B/1115445 Dated-12/03/2021अन्वये प्रसिध्द केले असता मुदतीत एकूण नऊ दरपत्रके प्राप्त झालेली असून Fire suppression foam (AFFF concentrate for Fire fighting)as per IS 4989 - 2000 Ltrs.करिता खालील तक्त्यात कॉलम क्र.५ मध्ये नमुद केल्याप्रमाणे एकूण लघुत्तम किंमत प्राप्त झालेली आहे.

<u>लघुत्तम किंमतधारक पुरवठादाराचे नाव - राजिंद्र फायर सर्व्हिस</u>

| अ.क्र. | साहित्याचा तपशील | परिमाण | Bid Number / दिनांक | GeM पोर्टलवरील प्राप्त लघुत्तम एकूण किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| 1) | Fire suppression foam (AFFF concentrate for fire fighting) as per IS 4989 | 2000 Ltrs. | GEM/2021/B/1115445 Date.12/03/2021 | 1,24,800=00 |
| | | | **Total Rs.** | **1,24,800=00** |

अग्निशमन विभागाकडील मागणी प्रस्तावान्वये अ.क्र.१ ते ११ प्रकारचे साहित्यापैकी अ.क्र.३ ते ९ व ११ प्रकारचे साहित्य ई-निविदातील स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम दरात वाटाघाटीनंतर कमी करुन दिलेल्या दराने खरेदीस रक्कम रुपये.२९,६६,९५८=००फक्त तसेच GeM पोर्टलवरुन खरेदी प्रक्रिया करुन प्राप्त लघुत्तम किंमत अ.क्र.१ करिता रक्कम रुपये.१४,२२,४००=००,अ.क्र.२ करिता रक्कम रुपये.३,६०,०००=०० व अ.क्र.१० रिता रक्कम रुपये.१,२४,४००=००फक्त असे एकूण रक्कम रुपये.४८,७३,७५८=०० फक्त(अक्षरी रक्कम रुपये.अठठेचाळीस लक्ष त्र्याहत्तर हजार सातशे अठठावंन्न फक्त)खर्च येणार आहे.

तरी वरिलप्रमाणे खरेदी प्रक्रियेनुसार अग्निशमन विभागासाठी जिल्हा नियोजन विकास समितीमार्फत महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानाअंतर्गत प्राप्त अनुदानातून साहित्य खरेदीस व त्याकामी येणा-या रक्कम रुपये.४८,७३,७५८=००फक्त(अक्षरी रक्कम रुपये.अठ्ठेचाळीस लक्ष त्र्याहत्तर हजार सातशे अठठावंन्न फक्तच्या)खर्चास मंजुरी मिळणेबाबत मा.स्थायी समितीपुढे प्रस्ताव सादर करण्यास मंजुरी मिळावी ही विनंती आदेशार्थ सविन सादर/अ

अंदाजपत्रकीय तरतुद- सन २०२१-२०२२
जिल्हा नियोजन विकास समितीमार्फत
महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानांतर्गत प्राप्त अनुदान रक्कम रूपये ६१,२०,०००/-
आतापर्यत झालेला खर्च रू. निरंक
प्रस्तावीत खर्च- रू. ४८,७३,७५८/-
एकुण खर्च- रू. ४८,७३,७५८/-
उपलब्ध शिल्लक- रू.१२,४६,२४२/-

येणेप्रमाणे स्टोअर विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मुख्य अग्निशमन अधिकारी यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत नुसार मान्यतेस्तव
यावर लेखापरिक्षक / मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत "अ" प्रमाणे कार्यवाहीस्तव सादर.
यावर मा. सहाय्यक आयुक्त (कर) यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत "अ" प्रमाणे मान्यतेस्तव सादर.
यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, स्थायी ला पाठविणेसाठी मान्यतेस सादर.
यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर

--**--

**ऑनलाईन V.C. चर्चा :-**

अग्नीशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :- जिल्हा नियोजन विकास समिती मार्फत फायर सुट,फायर इक्वीपमेंट करीता अनुदान प्राप्त झाले आहे.सदर साहित्य खरेदी कामी स्टोअर विभागामार्फत जी.एम.पोर्टल वरून निविदा प्रक्रीया राबविली आहे.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- अग्निशमन वाहन खरेदी करीता निविदा मगविण्यात आली होती त्याचे काय झाले.?

अग्नीशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :- टाटा मोटर्स कडून चेसी खरेदी करण्याची ऑर्डर दिली आहे.साधारणत:येत्या आठ दिवसांमध्ये आपल्याला गाडी उपलब्ध होईल.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- अग्निशमन विभागाकरीता ज्या ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्याची मागणी करा.या बाबत वेळोवेळी चर्चा झाली आहे.अग्निशमन विभागाकडे प्रशिक्षीत कर्मचा-यांची कमतरता आहे.त्याची मागणी करा.

अग्नीशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :- तीन चे चार महिन्यामध्ये चेसीज घेत आहोत.

मा.सभापती साहेब :- अग्निशमन विभागाकडे सध्या किती वाहने आहेत.

अग्नीशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :- दोन मोठया गाडया व एक जीप कंडीशन मध्ये आहेत.माळीवाडयात दोन व सावेडी येथे एक गाडी आहे.अतिरीक्त वाहन घेत आहोत.

मा.सभापती साहेब :- नविन तंत्रज्ञान असलेली वाहने आली आहेत त्यांचे खरेदीचा प्रस्ताव दया.मा.आयुक्त साहेब यांचे बरोबर चर्चा करून निर्णय घेवू.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- मा.उपायुक्त साहेब ,तातडीने वाहन खरेदी बाबत कार्यवाही करावी.एखादी दुंघटना घडली तर खुप मोठी मनुष्य हानी होवू शकते. शहरामध्ये मोठया इमारती उभ्या रहात आहेत.साई दिप हॉस्पीटल सारख्या बिल्डींगला आग वगैरे लागलीतर प्रचंड हानी होवू शकते.मा.आ.संग्राम भैय्या जगताप यांच्या माध्यमातुन निधी उपलब्ध होईल.अग्निशमन विभाग सक्षम करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- या ठकेदाराबाबत काही तक्रारी प्राप्त झाल्या आहेत का? त्याला आपण काम देवू शकतो का?

अग्नीशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :- ॲक्सेस टेक्सटाइल व फायर टेक्स प्रोटेक्टीव्ह टेक्नॉलॉजी अर्जान्वये ५एस प्रायव्हेट लि.यांना सिडको ऑफ महाराष्ट यांनी ब्लॉक लीस्ट केले असल्याचे महानगरपालिकेस कळविले होते.त्यांना ब्लॉक लीस्ट केल्याच्या विरोधात त्यांनी मा.मुंबई उच्च न्यायालयात याचीका दाखल केली होती.परंतु न्यायालयाने सिडको यांनी केलेली कार्यवाही योग्य असल्याने त्यांचे आदेश कायम ठेवले आहेत.तो विषय सिडको एरीयापुरता मर्यादित होता.मागच्या वर्षी त्यांनी इतर मनपांना पुरवठा केलेला आहे.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- त्याची पुर्ण शहनिशा करावी ,माहिती घेवूनच प्रशासकिय पातळीवर निर्णय घ्यावा.

अग्नीशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :- या बाबतीत विधी सल्लागाराचे मत घेता येईल.

मा.उपायुक्त (कर) श्री.डांगे :- आपल्या संस्थे पुरता निर्णय घेवू, त्यांनी इतर संस्थांकडे कामे केली असतील तर त्यांना प्राधान्य देता येईल.स्टोअर विभागाचे जाधव यांनी मला अत्ताच माहिती दिली ,तो निर्णय सिडको पुरता मर्यादित होता. संबंधीत एजन्सीने केंद्रीय, राज्यस्तरीय व विविध महानगरपालिका यांना साहित्य पुरवठा केलेला आहे त्यामुळे त्यांना आदेश देण्यास हकरत नसावी.

मा.श्री. मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यांत यावा.

मा.सौ. सोनाबाई शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यांत यावा.

मा.सभापती साहेब :-अग्निशमन विभागासाठी जिल्हा नियोजन विकास समितीमार्फत महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानाअंतर्गत प्राप्त अनुदानातून नमूद प्रस्तावामध्ये सादर केलेल्या साहित्य खरेदीस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यांत येत आहे.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्टनुसार अहमदनगर महानगरपालिका अग्निशमन विभागासाठी जिल्हा नियोजन विकास समितीमार्फत महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियाना अंतर्गत प्राप्त अनुदानातून नमूद प्रस्तावामध्ये सादर केलेल्या साहित्य खरेदीस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. मुदस्सर शेख सही/-

अनुमोदक :- मा.सौ.सोनाबाई शिंदे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका